दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १३३ वा शुक्रवार दि.०१ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# लाडकी बहीण योजनेला विरोध करणाऱ्या काँग्रेसला महिलांनी मताद्वारे धडा शिकवावा-संजिवनीताई कराड

## महायुतीच्या प्रचारार्थ सौ. कराड यांनी पानगाव शहरासह परिसर ढवळून काढला







लातूर : – महिलांना आणि मुलींना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे, त्या आत्मनिर्भर व्हाव्यात यासाठी राज्यातील महायुती शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला मात्र या निर्णया विरोधात काँग्रेसवाले न्यायालयात गेले. महिलांचे हिताची जपणूक करणाऱ्या योजनेला विरोध करणाऱ्या काँग्रेसला महिलांनीच आपल्या अमूल्य मतातून धडा शिकवावा आणि महायुतीला आशीर्वाद द्यावेत असे आवाहन भाजपाच्या सौ. संजीवनीताई रमेशअप्पा कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रचारार्थ पानगाव शहरासह रामवाडी, फावडेवाडी, मुसळेवाडी, नरवटवाडी येथे महिलांच्या गाठीभेटी आणि बैठका घेऊन सौ. संजीवनीताई कराड यांनी संपूर्ण परिसर ढवळून काढला. या प्रचार दौऱ्यात महिला मतदारांनी मोठा प्रतिसाद देत लाडका भाऊ रमेशआप्पा कराड यांनाच आमचा आशीर्वाद आणि आमचे मत असल्याची ग्वाही दिली.

प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या पानगाव येथील पुरातन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मनोभावे दर्शन घेऊन सौ. संजीवनीताई कराड यांनी भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रचाराला प्रारंभ केला. यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीचे दर्शन घेऊन भवानी मंदिर विश्वकर्मा मंदिरास भेट देऊन ललिता कांबळे, अर्चना वाटोळे, बालाजी कस्तुरे, समशेर पठाण, मारुती गालफाडे, जयश्री जाधव यांच्या निवासस्थानी बोलावलेल्या महिलांच्या बैठकीत त्याचबरोबर फावडेवाडी येथे दिनकर गीते, नरवटवाडी येथे सतीश आंबेकर मुसळेवाडी येथे दत्तात्रय जाधव आणि रामवाडी येथे आयोजित बैठकीस उपस्थित महिलांना आपल्या भागाच्या विकासासाठी आणि महिलांच्या हितासाठी महिलांचे सन्मान करणारे महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आले पाहिजे यासाठी आपल्या भागातून आ. रमेशआप्पा कराड यांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले. महिलांना विविध योजनाचा लाभ देणाऱ्या लाडकी बहीण योजने अंतर्गत मदत करणाऱ्या महायुती शासनाच्या पाठीशी महिलांचे समर्थन असून महिला भजनी मंडळांना साहित्य आणि विविध योजनेचा लाभ मिळवून देणाऱ्या आ. रमेशआप्पा कराड यांनाच महिलांचे आशीर्वाद असल्याचे अनेक महिलांनी सौ. संजीवनीताई कराड यांना बोलून दाखविले. प्रत्येक ठिकाणच्या बैठकीस महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या प्रचार फेरी दौऱ्यात सतीश आंबेकर, सुकेश भंडारे अनंत चव्हाण, श्रीकृष्ण जाधव, अमर चव्हाण, गणेश तुरुप, श्रीकृष्ण गुरले सरपंच मीनाताई मोटाडे, उपसरपंच प्रेमलता वाघमारे, भाजपाच्या ललिता कांबळे, अनुसया फड, शिला आचार्य, अयोध्या आंबेकर, पार्वती सोमवंशी, शिवकन्या गंगणे, जयश्री अनगुठे, शोभा संपत्ते, पार्वती गुडे, अयर्ना मोटाडे, धोंडीराम हलकुडे, जयराम कस्तुरे, डॉ. हेरकर भागवत गीते, गोपाळ शेंडगे, मारुती गालफडे, राम भंडारे, सतीश कुलकर्णी, शफिक पठाण, इसाक शेख, बाबुराव कस्तुरे, बाळू भंडारे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते आणि त्या त्या भागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# उमेदवार अमित देशमुख यांनी गंजगोलाई परिसरातील टिप-टॉप कलेक्शनला दिली भेट

ईश्वरप्रसाद जगनाथ डागा व ओमप्रकाश जगनाथ धागा यांच्या गंजगोलाई परिसरातील कापड लाईन येथील ईश्वरप्रसाद ओमप्रकाश डागा वस्त्र दालनाला लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास काँग्रेस आघाडीचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी भेट देऊन त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली.

लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी गंजगोलाई परिसरातील मेन रोडवरील अक्षय राजकुमार शेळके यांच्या बावरी लेडीज वेअरला भेट दिली तसेच गंजगोलाई परिसरातील हातगाडे डायफ्रुट विक्रेते, फेरीवाले यांच्याशी संवाद साधला.



लातूर / प्रतिनीधी :– महाविकास आघाडी सरकारने कोरोना काळात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल युनायटेड नेशन वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन व सर्वोच्च न्यायालयाने घेतली मात्र कोरोना काळात भाजप नेते कटकारस्थान षड्यंत्र रचून त्यांनी महाविकास आघाडीचे सरकार पाडले. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा विचार लातूरात बळकट करा, या लातूरला आता महाराष्ट्रात काम करण्याची संधी आहे, असे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी यांनी गुरुवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी लातूर शहरातील गंजगोलाई परिसरातील मेन रोडवरील सचिन लोहीया यांच्या टिप-टॉप कलेक्शनला भेट देऊन पाहणी करून दीपावली सणातील व्यापाऱ्याची उलाढाल आदीसह विविध विषयावर चर्चा करून सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या, याप्रसंगी ते बोलत होंते.. यावेळी माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मोईज शेख, लातूर रेडिमेड कापड असोसिएशन अध्यक्ष तुकाराम पाटील, दिनेश इनानी, अभय शहा डी.एन.शेळके, उद्धव पिनाटे, मुकेश जोधवानी, विजय वर्मा, आनंद मालू, शरद हंचाटे, संजय पतंगे, शेखर मुक्कावार, आप्पा खेकडे, गोविंद हेड्डा, व्हा. चेअरमन विजय देशमुख, गिरीश ब्याळे, यशपाल कांबळे, अभिषेक पतंगे, नितीन शेळके, रईस टाके, व्यंकटेश पुरी, सचिन राठोड, आबू मनियार, राजकुमार शेळके, मुन्ना तळेकर, असलम शेख, सिराज शेख आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी लोहीया कुटुंबीय मित्रपरिवार व्यापारी उपस्थित होते. महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारने कोरोना काळात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल युनायटेड नेशन वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन व सर्वोच्च न्यायालयाने घेतली मात्र कोरोना काळात भाजप नेते कटकारस्थान षड्यंत्र रचून त्यांनी महाविकास आघाडीचे सरकार पाडले. महाविकास आघाडीचा विचार लातूरात बळकट करा, या लातूरला आता महाराष्ट्रात काम करण्याची संधी आहे, या दिवाळीत लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रयत्नामुळे लातूर पुणे इंटरसिटी विशेष रेल्वे सुरू झाली, लातूर शहरात फेक नॅरेटिव्ह तयार करण्याचा विरोधक प्रयत्न करत आहेत, त्यांना कोणीही बळी पडू नये, भारतीय जनता पक्षाला लातूर शहर विधानसभेत अजूनही उमेदवार सापडत नाहीत, भाजप कार्यकर्त्यांनी पक्षासाठी आयुष्य झिजवायच आणि उमेदवारी मात्र दुसरेच घेऊन जातात, महाराष्ट्राची अस्मिता धर्म पाळून महाराष्ट्राला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्याची आता गरज आहे, असे सांगून त्यांनी येत्या २० नोव्हेंबरला महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन केले.

# विकासाची गंगा सर्वसामान्यांच्या दारापर्यंत आणण्यासाठी पुन्हा एकदा ना.संजय बनसोडे यांना निवडून द्या - सौ.शिल्पा बनसोडे



उदगीर / बाबासाहेब मादळे :– गेली पाच वर्ष उदगीर मतदार संघाची अविरत पणे सेवा करणारे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी तळागाळातील जनतेच्या दारापर्यंत विकासाची गंगा पोहोचवली मतदारसंघाला आपले कुटुंब समजून रात्रंदिवस सर्वसामान्यांच्या हितासाठी ना.बनसोडे यांनी काम केले असुन विकासाची गंगा सर्वसामान्यांच्या दारापर्यंत आणण्यासाठी पुन्हा एकदा ना.संजय बनसोडे यांना निवडून द्या असे मत सौ.शिल्पा बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील नागरिकांशी संवाद साधताना बोलत होत्या. यावेळी माजी आ. गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, माजी सभापती सिध्देश्वर पाटील, ॲड.गुलाबराव पटवारी, सौ.दिपाली औटे,गोदावरी महाजन, डॉ. विश्वनाथ डांगे, डॉ. बिरादार, डॉ.दिपक जगताप, डॉ.पदातुरे,डॉ.बावगे, डॉ. पाटील,डॉ.सोनल मोरे, डॉ.संदिप सोनटक्के, डॉ.माधवी जाधव, डॉ.अनुप चिकमुर्गे, डॉ. रेखा रेड्डी,डॉ.रश्मी चिद्रे, प्रदीप बेद्रे, अभिजित औटे, साईप्रकाश पारसेवार, सरोजा वारकरे, अनुराधा धोंड,शितल बिरादार, योजना चणगे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना सौ.शिल्पा बनसोडे यांनी, ना.बनसोडे यांनी, मागील ५ वर्षाच्या काळात सामान्य जनतेच्या हितासाठी झपाटून काम केले आहेत. विविध योजना सर्वसामान्यांच्या दारी पोहचवल्या. महिलांना स्वबळावर उभे राहावे यासाठी सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवली. त्या योजनेची सर्वधिक नोंदणी ही आपल्या मतदार संघातून ना.बनसोडे यांनी केली. शेतकऱ्यांसाठी अनेक क्रांतिकारी योजनांचे निर्णय घेतले. त्यामुळे सामान्य जनतेच्या मनात महायुतीच्या सरकारबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली आहे. राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री नामदार संजय बनसोडे यांनी आपल्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात उदगीर मतदार संघात कोट्यावधी रुपयाचा विकास निधी खेचुन आणून उदगीरचा कायापालट केला. केवळ विकास कामे करून ते थांबले नाहीत तर सामान्य जनतेशी ते कायम संपर्क ठेवून जनतेतला मंत्री म्हणून त्यांनी आपली ओळख संबंध महाराष्ट्रात निर्माण केली. आज विरोधक दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत परंतु उदगीरच्या विकासासाठी पुन्हा एकदा संजय बनसोडे यांनाच येत्या निवडणुकीत सर्वाधिक मताने निवडून देवून त्यांच्या कार्याची पावती आपण सर्वांनी द्यावी असे आवाहन ना.संजय बनसोडे यांच्या पत्नी सौ.शिल्पा बनसोडे यांनी केले. यावेळी उदगीर शहरातील विविध प्रभागातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जरांगेंच्या रुपात देशाला गांधी, आंबेडकर, मौलाना आझाद मिळणार

जालना : विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभा करण्यासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या अंतरवली सराटी येथे बैठका सुरु आहेत. आज अंतरवलीत मुस्लीम धर्मगुरु सज्जाद नोमानी, स्वत: मराठा आदोलक मनोज जरांगे आणि आनंदराज आंबेडकर आंबेडकर एकत्रित आलेले पाहायला मिळाले. या तिनही नेत्यांमध्ये अंतरवलीत बैठक पार पडली. यानंतर पत्रकार परिषद घेतली. यावेळी मुस्लीम धर्मगुरु सज्जाद नोमानी यांनी जरांगे यांचे कौतुक केले.

मुस्लीम धर्मगुरु सज्जाद नोमानी म्हणाले, भारताच्या संविधानाप्रमाणे दुसरे कोणते संविधान नाही. संविधानातील प्रत्येक शब्दावर चर्चा होत होती. ती चर्चा त्यांच्या मुलाबाळांसाठी नाही. शेतकरी, मजूर आणि कष्टक-यांसाठी करत होते. भारतातील शोषित समाजाच्या चर्चा पार पडत होती. महाराष्ट्राने यामध्ये लिडिंग रोल घेतला होता. ही बाब महाराष्ट्रातील लोकांना समजली पाहिजे. महाराष्ट्रात महापुरुष जन्माला आले. मी उत्तर प्रदेशचा आहे पण मनोज जरांगेंनी मला मराठी शिकवली, मी जरांगे यांना हिंदी शिकवेन असेही नोमानी म्हणाले.

संपूर्ण देशात मनोज जरांगेंची गरज आहे. त्यामुळे हिंदी शिकणे गरजेचे आहे. मी प्रत्येक ठिकाणी त्यांच्या बोलण्याचा अनुवाद करेन. मनोज जरांगेंच्या रुपाने भारताला आधुनिक गांधी-आंबेडकर आणि कलाम मिळणार आहेत असेही नोमानी म्हणाले. दलित, मुस्लीम आणि मराठा एकत्र आलाय हे फायनलही आनंदाची वार्ता मराठ्यांमध्ये गेली. मुस्लीम आणि दलित एकत्र आहेत, मराठ्यांचे मतदान विभागले जात होते. आता मराठा,



मुस्लीम आणि दलित एकत्र झाल्याने कुणी आपल्या जागा पाडू शकणार नाही.

नेत्याला आणि पक्षाला मतदान करायचे नाही. आमचा शिक्का चालणारचतुम्हाला शेतकरी, गोरगरिब ओबीसी, मराठा मोठा करायचाय तर एकही मत वाया जाता कामा नये. मतदानाच्या आदल्या दिवशी आणि मतदानाच्या दुस-या दिवशी ३ दिवस सुटी काढायची, गावात मतदानाला यायचे, शांततेत मतदान करायचे आणि माघारी यायचे. ७५ वर्षातून ही संधी मिळाली ती वाया जाऊन द्यायची नाही असे आवाहन मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मुस्लीम, दलित आणि मराठा समाजाला केले आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### मुंबईतील रणधुमाळी!

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत ईशान्य मुंबई मतदारसंघ लक्षवेधी ठरणार आहे. कारण या मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी अशी सरळ लढत होत आहे.

ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघ हा एकेकाळी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा गड मानला जात होता. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर संजय दिना पाटील यांनी टोपी बदलली व उबाठा शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे हा मतदारसंघ मविआचा म्हणून मानला जाऊ लागला.परंतु येथील विधानसभा मतदारसंघाचे चित्र हा मनसेचा मतदार असल्याचे दिसत आहे. नाही म्हणायला सध्या भाजपाचा बोलबाला येथे फार आहे. तरीही महायुती व महाविकास आघाडी अशीच दुरंगी लढत इथे होत आहे.

मुलुंड, विक्रोळी, भांडुप, घाटकोपर पूर्व व घाटकोपर पश्चिम तसेच मानखुर्द शिवाजीनगर हे सहा विधानसभा मतदारसंघ या लोकसभा क्षेत्रात येतात. सध्याच्या राजकारणात भाजपाचे तीन, उबाठा शिवसेनेचे दोन व समाजवादी पक्षाचा एक असे सहा विद्यमान आमदार पुन्हा आपले नशीब अजमावत आहेत. पुनर्विकासाबरोबरच वाढते प्रदूषण, कायदा व सुव्यवस्था तसेच पाणीकपात हे येथील कळीचे मुद्दे आहेत; परंतु ते सोडविण्यात एकाही पक्षाला रस नाही. सर्वसामान्यांची तक्रार किरकोळ गुन्ह्यासाठी असेल तरच इथे गुन्ह्यांची नोंद होते, अशाही दैनंदिन खुमासदार चर्चा येथे झडत असतात.

घाटकोपर पश्चिममध्ये वाहतूक समस्येबरोबर नवीन रस्ते निर्माण करायला संभाव्य पुनर्विकासाचे प्रकल्प अडथळा बनत आहेत. मुंबई वाढत असताना घाटकोपरकडे झालेले दुर्लक्ष हे घाटकोपरवासीयांच्या मुळावर उठले असे म्हटले तरी गैर ठरणार नाही. भाजपच्या राम कदमांचा सुरक्षित मतदारसंघ असे समीकरण जुळले आहे. इथली दहीहंडी मोठ्या रकमाच्या बक्षिसांमुळे जगभर प्रसिद्ध असल्याने इथला गरीब मतदार हा कदमांचा भक्त बनल्याचे जाणवते. यावेळी उबाठामुळे या मतदारसंघाचे गणित बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

घाटकोपर पूर्व मतदारसंघातही भाजपचाच जोर आहे. २०१९च्या विधानसभा निवडणुकांत प्रकाश मेहता यांचा पत्ता कापून पराग शहा तेथे आले. त्यावेळी मेहता समर्थकांनी बरीच आदळआपट केली; परंतु पक्ष नेतृत्वापुढे त्यांचे काही चालले नाही. शहांनीही या मतदारसंघातील विजयाची परंपरा कायम राखत नेत्यांचा विश्वास सार्थ ठरवला व जनताभिमुख कार्य करत मतदारांना प्रभावित केले; परंतु पाणीकपात हा मुद्दा मात्र सोडवणे त्यांनाही जमले नाही. त्यामुळे येथील भाजपचा परंपरागत मतदार नाखूश आहे.

विक्रोळी मतदारसंघ मनसे प्रभावित असून मंगेश सांगळे हा तिथला शिलेदार. पुढे स्थानिक राजकारणामुळे तिथली मनसे फुटून विखुरली गेली. काँग्रेसविरोधी कोकणी जनता तेथे असल्यामुळे शिवसेनेत जाणे बर्याच मनसैनिकांनी पसंत केले. संजय राऊत यांचे बंधू सुनील राऊत तेथे परिचित असल्यामुळे आमदारकीसाठी दावा ठोकून होतेच. त्यांना त्याचा फायदा झाला. या मतदारसंघाचा ताबा त्यांनी घेतला. सध्याच्या अस्थिरतेच्या वातावरणात ते तिथले अनभिषिक्त सम्राट मानले जात आहेत. या मतदारसंघात त्यांची पाळेमुळे खोलवर रुजली गेली आहेत. परिणामी राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय पिसाळ हे त्यांच्याविरुद्ध लढले असते, तर तुल्यबळ लढत दिसली असती. परंतु जागावाटपात ती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे गेली आहे. त्यामुळे राऊतच इथले राजे म्हणता येईल.

भांडुप पश्चिमेचा मतदारसंघही मनसेच्याच संस्कारातील. शिशीर शिंदेंनी बांधणी केलेल्या या मतदारसंघात मनसेचे प्रशंसनीय कार्य होते. फक्त जनसंपर्क सुटला आणि मते विखुरली गेली. शिवसेनेच्या रमेश कोरगावकरांनी ही मतं एकत्र करून शिवसेनेकडे खेचली आणि २०१९च्या निवडणुकीत मनसेच्याच संदीप जळगावकरांचा २५ हजारांहून अधिक मताधिक्याने पराभव केला. सत्तांतर काळातही उद्धव ठाकरेंबरोबर एकनिष्ठ राहिल्याने उबाठा शिवसेनेने त्यांना पुन्हा नशीब अजमावण्याची संधी दिली आहे. कोरगावकरांचे कार्य विकासाभिमुख राहिल्याने भांडुपचा मतदार त्यांच्याकडे ओढला गेल्याचे शिवसैनिकांना वाटत आहे. काँग्रेसचे भाई जगतापही या मतदारसंघात लोकप्रिय असल्याने कोरगावकरांना मते खेचण्यासाठी त्यांचाही फायदा उठवता येईल.

कट्टर उद्धव ठाकरे विरोधक किरीट सोमय्या यांचा मुलुंड विधानसभा मतदारसंघ. लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले मिहीर कोटेच्या विधानसभेच्या रणांगणात पुन्हा नशीब अजमावयाला उतरले आहेत. २०१९ च्या निवडणुकीत ८७ हजारांहून अधिकचे मताधिक्य मिळवत आपला या मतदारसंघातील विजय मिळवला होता. लोकसभा निवडणुकीत संजय पाटील यांच्याकडून पराभूत झाल्याने ते विधानसभेची जागा राखतात की तीस वर्षांनी हा मतदारसंघ भाजपच्या हातून निसटतो याचे उत्तर मतदारांकडून मिळेल. गुजराथी व मारवाडी बहुभाषिक असल्याने भाजपचा पराभव करणे काँग्रेसला जमण्यासारखे नाही.

मानखुर्द शिवाजीनगर हा विधानसभा मतदारसंघ गुन्हेगारीचे आगार व अनधिकृत बांधकामांचे साम्राज्य असलेला. 'यथा राजा तथा प्रजा' ही म्हण या मतदारसंघात तंतोतंत लागू होते. समाजवादी पक्षाचे अबू आझमी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. मविआ किंवा महायुतीतील शिवसेनेने हा मतदारसंघ काबीज करणे अशक्यप्राय बाब ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रभावाने थोडीफार मात करता येईल असे स्वप्न फारतर आशावादी मनाने बघता येईल; पण तेही प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता नाही.

ईशान्य मुंबईच्या या सहा मतदारसंघात सर्व लढती दुरंगीच असणार आहेत. परंतु मनसे हा मतदार फॅक्टर मते खाऊन जाणारा ठरला, तर भाजप व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेस फायदा होणार नाही. परंतु जनता ऐनवेळी कोणाच्या बाजूने रंग दाखवते हे मतदानाच्या वेळीच स्पष्ट होईल.

# टाटा ग्रुप कंपनीचे संस्थापक जमशेटजी टाटा ते रतन टाटा.

भारतात आजच्या घडीला सार्वजनिक आरोग्य,शिक्षण आणि रोजगार देणारे उद्योग भांडवलदार स्वतःच्या फायद्यासाठी घेऊन त्यांचा धंदा करीत आहेत. त्यातुन भारतीय नागरिकांचे जेवढे शोषण करता येईल




तेवढे शोषण करणारी यंत्रणा उभी करीत आहेत. ज्यांनी देशासाठी कोणतीही गोष्ट निर्माण केली नाही.तेच उद्योगपती देशातील सार्वजनिक सेवा देणारे उद्योग टाटा घराणे : भारतातील लोखंड व पोलाद उद्योगाचा पाया घालणारे,तसेच भारताच्या औद्योगिक प्रगतीकरिता कापडगिरण्या, जलविद्युत्प्रकल्प उभारणारे जगप्रसिद्ध कारखानदार, व्यापारी,दानशूर व देशभक्त घराणे.टाटा उद्योगसमूहाचे संस्थापक जमशेटजी नसरवानजी, त्यांचे दोन सुपुत्र सर दोराबजी व सर रतनजी आणि जमशेटजींचे पुतणे जहांगीर रतनजी दादाभाई (जे.आर.डी) हे या घराण्यातील धडाडीचे,



कल्पक व दीर्घोद्योगी असे कर्ते पुरुष होत. एकाच घराण्यातील तीन कर्तबगार पिढ्यांनी घडवून आणलेला देशाचा प्रचंड औद्योगिक विकास, ही एक अनन्यसाधारण वस्तुस्थिती होय.

टाटा उद्योगाचे आद्य प्रवर्तक जमशेटजी नसरवानजी (३ मार्च १८३९–१९ मे १९०४) यांचा जन्म गुजरात राज्यातील नवसारी येथे एका पारशी घराण्यात झाला. जमशेटजींच्या वडिलांची मुंबईत व्यापारी पेढी होती. वयाच्या तेराव्या वर्षी ते शिक्षणासाठी मुंबईस आले. १८५६–५८ या काळात त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजमधून शिक्षण घेतले. रामकृष्ण गोपाळ भांडारकर व दिनशा वाच्छा हे जमशेटजींचे सहाध्यायी होते. १८५८ मध्ये जमशेटजी एल्फिन्स्टनमधून 'ग्रीन स्कॉलर' (पदवीप्राप्त) म्हणून उत्तीर्ण झाले. विद्यार्थिदशेत असतानाच जमशेटजींचा करसेटजी डाबू या पारशी गृहस्थांच्या हीराबाई या कन्येशी विवाह झाला. दोराबजी (जन्म १८५९) व रतन (जन्म १८७१) हे त्यांचे पुत्र. १८५९ मध्ये जमशेटजी आपल्या वडिलांच्या व्यवसायात शिरले. याच सुमारास हाँगकाँगच्या 'जमशेटजी ड अर्देशिर' शाखेच्या व्यवहारात लक्ष घालण्यासाठी त्यांना हाँगकाँगला पाठविण्यात आले. तेथूनच पुढे ते शांघायला गेले व तेथे त्यांनी दुसरी शाखा उघडली. १८६५ मध्ये यंत्रविद्येचे ज्ञान मिळविण्यासाठी जमशेटजी मँचेस्टरला गेले. इंग्लंडमध्ये ते चार वर्षे होते. स्वदेशी परतल्यावर त्यांनी मुंबईच्या चिंचपोकळी भागातील दिवाळे निघालेली एक तेलगिरणी विकत घेऊन तिचे कापडगिरणीत रूपांतर केले. तिचे 'लेक्झांड्रा मिल' असे नामकरण करून त्यांनी आपल्या औद्योगिक कारकीर्दीस प्रारंभ केला. या पहिल्याच उपक्रमामुळे जमशेटजींना कीर्ती व संपत्ती या दोहोंचाही लाभ झाला. जमशेटजींनी ही भरभराटीस आणलेली गिरणी विकून टाकली. यानंतर मोठ्या आकारामानाची कापडगिरणी स्थापण्याचा संकल्प सोडून ते कापडउद्योगाचे अधिक शास्त्रशुद्ध ज्ञान मिळविण्याकरिता पुन्हा इंग्लंडला गेले. तेथे फिरोजशहा मेहतांशी त्यांचा घनिष्ठ स्नेह जडला. १८७४ मध्ये भारतात परतल्यावर अनेक मित्रांचा विरोध असूनही जमशेटजींनी मुंबईऐवजी नागपूर येथे 'एम्प्रेस मिल्स' ही कापडगिरणी सुरू केली (१ जानेवारी १८७७) एम्प्रेस मिल्सच्या स्थापनेपासूनच जमशेटजींनी कामगार कल्याण योजना कार्यान्वित केल्या. कुर्ला येथील 'धरमसी मिल' ही जुनी गिरणी विकत घेऊन (१८८६) तिचे 'स्वदेशी मिल्स' मध्ये रूपांतर करून त्यांनी कापडधंद्याचा विस्तार केला. त्याच वर्षी जमशेटजींनी अहमदाबाद येथील 'डव्हान्स मिल्स' ही कापडगिरणी भरभराटीस आणली. स्वदेशी मिल्स या गिरणीच्या रूपाने जमशेटजींची स्वदेशी चळवळीबद्दल वाटणारी आस्था प्रकट झाली, तर डव्हान्स मिल्सच्या रूपाने त्यांचा कापडउद्योगातील आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन दिसून आला. भारतीय कापडउद्योगाचे आधुनिकीकरण करण्याचे श्रेय जमशेटजींना द्यावे लागते. त्याच्याच अनुषंगाने भारतात लांब धाग्याचा कापूस उत्पादनाकरिताही त्यांनी प्रयत्न केले.

जमशेटजींनी आपल्या कापडगिरण्यांचे व्यवस्थापन म्हणजे वित्तपुरवठा, यंत्रसामग्री, देखभाल आणि कामगारकल्याण इ. कार्यक्षम राखले होते. उद्योगधंद्यांतील सम्यक अर्थप्रबंधासाठी त्यांनी दाखविलेली योजकता व उपक्रमशीलता ही अनन्यसाधारण होती. परिणामतः त्यांनी प्रत्येक गिरणीतून तुलनेने अधिक नफा मिळवून दाखविला. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात असताना, जमशेटजींनी 'टाटा लोखंड व पोलाद कारखाना', जमशेटपूर व 'टाटा हायड्रो–इलेक्ट्रिक कंपनी' या दोन प्रकल्पांचे आराखडे वा योजना तयार केल्या. नागपूर, मुंबई, अहमदाबाद येथील गिरण्यांतून त्यांनी प्रासंगिक अकुशल कामगारांचे कुशल कामगारवर्गात रूपांतर केले. त्यांच्या कल्याणार्थ अनेक गोष्टी केल्या. कामगारांना अद्ययावत यंत्रसामग्री हाताळण्याचे प्रशिक्षण दिले.टाटा कंपनीत आज ही पाचव्या सहाव्या पिढीचे तरुण नोकरी करीत आहेत.

मुंबई शहरातील सुधारणांशी जमशेटजींचा संबंध १८६३ पासूनच होता. १८९० पासून त्यांनी मुंबईतील जमीनजुमल्यांच्या खरेदीस प्रारंभ केला. ते व त्यांचे कुटुंबीय एका वास्तूत बराच काळ कधीच राहिले नाहीत. वारंवार त्यांनी नवनवीन जमिनी खरेदी केल्या व त्यांवर इमारती बांधल्या. घरे बांधणे हा जमशेटजींचा एक आवडता छंद होता. त्यांनी मध्यमवर्गातील पारशी लोकांकरिताही घरे बांधली. शहरात उभारलेल्या अनेक भव्य इमारती म्हणजे टाटांच्या दानशूरत्वाचेच प्रतीक होय. पारशी जिमखाना उभारण्यात त्यांनी बरेच श्रम घेतले. १८९८ मध्ये ताजमहाल हॉटेलाचा शिलान्यास करण्यात आला. त्याला आंतरराष्ट्रीय दर्जा यावा म्हणून जमशेटजींनी यूरोपात दौरा काढून तेथील हॉटेल व्यवसायाचा अभ्यास केला. १९०३ मध्ये ताजमहाल हॉटेल सुरू झाले.जमशेटजींना ब्रिटिशांकित भारतातील सनदी नोकरवर्ग तयार करणारे शिक्षण प्रथमपासूनच आवडत नव्हते. तशातच 'जर हिंदी विश्वविद्यालये ही केवळ परीक्षा घेणारी यंत्रे बनतील, तर उच्च शिक्षणाची वाढ हिंदुस्थानात होणे अशक्य आहे', ह्या लॉर्ड रे यांच्या उद्गारांची भर पडली आणि या आक्षेपास उत्तर म्हणून जमशेटजींनी 'भारतीय विज्ञान संस्था' (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स) काढण्याचे ठरविले. संशोधनपर व शास्त्रीय दृष्टी येण्यासाठी प्राध्यापक बरजोर पादशहा यांना परदेशांस पाठविले. त्यांनी सबंध यूरोप, अमेरिका यांमधील नामवंत शास्त्रज्ञांच्या गाठीभेटी घेऊन स्वदेशास परतल्यावर जमशेटजींना अहवाल दिला. अमेरिकेतील 'जॉन्स हॉपकिन्स इन्स्टिट्यूट' सारखी संस्था भारतात उभारावयाचे ठरले त्यासाठी जमशेटजींनी ३० लक्ष रु. काढून ठेवले. १९११ मध्ये बंगलोर येथे या संस्थेच्या इमारतीचा पाया घालण्यात आला आणि त्याच वर्षी २४ जुलैपासून संस्था कार्यान्वित झाली. ही एक जगद्विख्यात संस्था मानली जाते.

अर्थव्यवस्थेची प्रगती सातत्याने चालू राहण्यात लोखंड व पोलाद उद्योगाचा फार मोठा वाटा असल्याने जमशेटजींच्या ध्यानात आले होते. बंगालमध्ये लोखंड आणि पोलाद यांच्या निर्मितीची आधुनिक पद्धतीनुसार शक्यता असल्याचा मेजर मॅहोन नावाच्या सरकारी अधिकाऱ्याचा अहवाल त्यांच्या वाचनात आला. त्यानुसार जमशेटजींनी शास्त्रीय ज्ञान संपादन करून संशोधन करविले आणि दोराबजी टाटा यांनी आपले भूवैज्ञानिक प्रमथनाथ बोस यांच्या साहाय्याने बंगालमध्ये लोखंडाच्या टेकडयांचा शोध लावला. याकरिता जमशेटजींनी स्वतःचे व लोकांचे मिळून १६ङ३ लक्ष पौंड भांडवल गुंतविले ते कमी पडू लागताच ग्वाल्हेरच्या महाराजांकडून त्यांना आणखी चार लक्ष पौंड मिळाले व या प्रचंड कामास प्रारंभ झाला. जमशेटजींनी भारताच्या बऱ्याच प्रदेशांची संशोधनपूर्ण पाहणी केली. शेवटी कोळसा व पाणी यांचे वैपुल्य असलेल्या बिहारच्या सिंगभूम जिल्ह्यातील एक स्थान त्यांनी निवडून तेथे पोलादकारखाना उभारावयाचे ठरविले. पूर्वीचे साक्ची नावाचे खेडे जमशेटपूर शहर बनले व तेथे 'द टाटा आयर्न अँड स्टील कंपनी' (टिस्को) हा कारखाना सुरू झाला. खनिज लोखंडापासून उत्कृष्ट पोलादापर्यंतच्या सर्व प्रक्रिया या कारखान्यात पार पाडल्या जातात. जगामधील प्रचंड व प्रगत लोखंड–पोलाद कारखान्यांमध्ये टिस्कोची गणना होते.जमशेटजींनी दुसरी भव्य योजना म्हणजे पश्चिमी घाटामधून पडणाऱ्या प्रचंड जलप्रपातांपासून वीजनिर्मिती करणे, ही होय. त्यासाठी या प्रकल्पाची पायाभरणी मात्र ८ फेब्रुवारी १९११ रोजी झाली. फेब्रुवारी १९१५ पासून लोणावळा, वळवण, शिरोटा, ठोकरवाडी व मुळशी या पाच ठिकाणी असलेल्या धरणांच्या पाण्याचा उपयोग करून खोपोली, भिवपुरी व भिरा येथील वीजउत्पादन केंद्रे मुंबईला विजेचा पुरवठा करू लागली.

ब्रिटिश जहाजउद्योगाला टक्कर देण्याकरिता त्यांनी आपली 'टाटा लाइन' ही जहाज कंपनीही उभारली होती. तथापि ब्रिटिश सरकारच्या वाहतूकदरांच्या स्पर्धेत जमशेटजींना आपल्या स्वदेशी जलवाहतूक कंपनीची प्रगती साधणे शक्य झाले नाही व तो नाद त्यांना सोडावा लागला. जो धंदा करावयाचा तो नाविन्यपूर्ण व त्यातील उत्पादन सफाईदार व पहिल्या दर्जाचे असले पाहिजे, या त्यांच्या 'टाटा टच' मुळे बाजारात 'टाटा' या नावाला फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली.जमशेटजींनी आपल्या औद्योगिक ध्येयवादात स्वदेशाच्या आणि स्वकीयांच्या गरजांची जाणीव सतत राखली होती. त्यांनी दूरदृष्टीने टाटा सन्स लि. या संस्थेची स्थापना करून (१८८७) तिच्याकडे आपल्या सर्व कंपन्यांचे व्यवस्थापन सोपविले. या संस्थेचे ८५ टक्के भांडवल टाटा कुटुंबातील मंडळींनी उभारलेल्या धर्मादाय न्यासांच्या मालकीचे असल्याने टाटा उद्योगसमूहातील विविध उद्योगांना आणि संस्थांना होणारा फायदा न्यासांकडे म्हणजे पर्यायाने जनतेकडे पोहोचविला जातो.भारतातील आधुनिक उद्योगधंद्यांचे प्रवर्तन जमशेटजींनी केले. 'इतर पुढारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीने जर हिंदुस्थानला जावयाचे असेल, तर त्याचे औद्योगिक कार्यक्षेत्र विस्तृत झाले पाहिजे हिंदुस्थानची भौतिक उन्नती होण्याचा शक्य कोटीत असणारा मार्ग हाच आहे', अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. व्यवहारी दृष्टीबरोबरच कल्पकता,उपक्रमशीलता, समयोचितता, धाडसीपणा आणि निकोप व्यापारी दृष्टी ह्या गुणांमुळेच जमशेटजींना अपार यश लाभले. रूढ धंद्यांपेक्षा नवेनवे औद्योगिक क्षेत्र शोधण्याकडे त्यांचा कटाक्ष असे.

राष्ट्रीय व आर्थिक पारतंत्र्याच्या काळात 'स्वदेशी'च्या संकल्पनेला सिद्धीचे रूप देण्यात, देशातील नैसर्गिक साधनसामग्रीच्या शोधाकरीता व विकासाकरिता प्रचंड श्रम घेण्यात आणि वैज्ञानिक अन्वेषणाची प्रेरणा देण्यात जमशेटजी टाटा हे अग्रभागी होते. देशातील खनिजसंपत्तीचा शोध व विकास हा देशातील लोकांनीच देशी भांडवलाच्या साहाय्याने घडवून आणला पाहिजे, या मतावर जमशेटजींचा पूर्ण विश्वास होता. यशस्वी उद्योगपती तसेच व्यापारी असूनही त्यांचे



औदार्य व दानशूरत्व अनन्यसाधारण होते. औद्योगिक क्रांतीच्या काही अनिष्ट परिणामांचेही त्यांना यथार्थ भान होते. त्यांपासून आपल्या कारखान्यांतील कामगारांना वाचविण्यासाठी कामगार–कल्याणाच्या अनेक योजना त्यांनी अंमलात आणल्या. ग्रंथ वाचणे व टिपणे काढणे, हा त्यांचा आवडता छंद होता. त्यांच्या सर्व लहानमोठ्या औद्योगिक प्रकल्पांना त्या त्या उद्योगधंद्यातील अद्ययावत ज्ञानाचे अधिष्ठान होते. नाउहाइम (प. जर्मनी) येथे वयाच्या पासष्टाव्या वर्षी या महान उद्योगपतीचे निधन झाले. त्यांचे शव लंडनला नेण्यात येऊन २४ मे १९०४ रोजी पारशी धर्मानुसार ब्रुकवुड येथे अंत्यसंस्कार करण्यात आला. 'भारतीय व्यापार व उद्योग यांच्या भरभराटीसाठी कोणत्याही तत्कालीन भारतीयाने जमशेटजींइतके प्रयत्न केले नाहीत', हे लॉर्ड कर्झनचे उद्गार यथार्थाने जमशेटजींची थोरवी व्यक्त करतात. त्यांच्या पश्चात सर दोराबजी व सर रतनजी या त्यांच्या दोन मुलांनी वडिलांची परंपरा यशस्वीपणे पुढे चालविली.



सर दोराबजी जमशेटजी टाटा : (२७ ऑगस्ट १८५९–३ जून १९३२). जमशेटजींचे ज्येष्ठ पुत्र. जन्म मुंबईस. वयाच्या सोळाव्या वर्षीच ते यूरोपात शिक्षणासाठी गेले. १८७६ मध्ये स्वदेशी परतल्यावर मुंबईच्या सेंट झेवियर महाविद्यालयातून ते बी.ए. झाले (१८८२). लहानपणापासून त्यांचा खेळाकडे, विशेषतः क्रिकेटकडे, विशेष ओढा होता. मर्दानी खेळांच्या आवडीमुळे मुंबईत अनेक व्यायामसंस्था सुरू करण्यात त्यांचा वाटा होता. वडिलांच्या कापसाच्या धंद्याचा विस्तार करून त्यांनी त्याच्या शाखा जगातील प्रमुख शहरांतून उघडल्या. टाटा लोखंड व पोलाद कारखाना, जमशेटपूर बंगलोरची भारतीय विज्ञान संस्था व लोणावळा येथील टाटा इलेक्ट्रिक कंपनीज या कंपन्यांच्या उभारणींमध्ये दोराबजींचा पुढाकार होता. स्त्रीशिक्षणार्थही त्यांनी आर्थिक साहाय्य केले. १९१० साली त्यांना ब्रिटिश सरकारकडून 'सर' हा किताब मिळाला. १९१५ मध्ये भारतीय औद्योगिक परिषदेचे ते अध्यक्ष, तर १९१८ मध्ये नेमलेल्या भारतीय औद्योगिक आयोगाचे ते एक सभासद होते. दोराबजींनी भारताचे औद्योगिकीकरण साधण्याच्या दृष्टीने वडिलांनी सुचविलेल्या अनेक योजनांना मूर्त रूप दिले, त्याचबरोबर समाजसेवेचे ही व्रत अखंडपणे चालविले. मेहेरबाई ह्या आपल्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी तिच्या स्मरणार्थ लेडी टाटा मेमोरियल ट्रस्ट स्थापन केला (१९३२). त्याचा उद्देश रक्तार्बुद विषयक रोगासंबंधी अधिक संशोधन व साहाय्य करणे हा होता. शिक्षणाविषयी दोराबजींचा उदार दृष्टिकोन होता आणि अभियांत्रिकी व वैद्यकीय संशोधन यांमध्ये तर यांना अधिक रस होता. १९२० मध्ये त्यांनी केंब्रिज विद्यापीठास अभियांत्रिकी विभागातील प्रयोगशाळांच्या साधनसामग्रीसाठी २०,००० पौंडांची देणगी दिली. आयुष्याच्या अखेरीस दोराबजींनी आपली सारी संपत्ती आपल्या नावाने उभारलेल्या न्यासास सार्वजनिक कार्यार्थ दिली. १९४५ मध्ये सर दोराबजी टाटा ट्रस्टजवळ सु. २० लक्ष पौंड रक्कम होती तीपैकी सु. आठ लक्ष पौंड रक्कम विविध दानकार्ये व टाटा मेमोरियल (कॅन्सर) हॉस्पिटल, टाटा समाजविज्ञान संस्था, टाटा मौलिक संशोधन संस्था इत्यादींसाठी खर्च करण्यात आली. एप्रिल १९३२ मध्ये दोराबजी धंद्यानिमित्त यूरोपला गेले. किसिंगन (प. जर्मनी) येथे त्यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिव अवशेष इंग्लंडला नेण्यात येऊन ब्रुकबुड येथील पारशी कबरस्तानात आपल्या दिवंगत पत्नीशेजारी त्यांचे दफन करण्यात आले.

सर रतनजी जमशेटजी टाटा : (२० जानेवारी १८७१–५ सप्टेंबर १९१८). जमशेटजींच्या या द्वितीय मुलाचा जन्म मुंबईत झाला. वडिलांच्या सर्व परंपरा त्यांनीही पुढे चालविल्या. टिस्कोच्या स्थापनेत त्यांचाही मोठा वाटा होता. रतनजी यांचा बुद्धीमंतांकडे अधिक ओढा होता आणि कलाविषयांमध्ये त्यांना विशेष रस होता. मृत्यूनंतर त्यांचा मोठा कलावस्तुसंग्रह प्रिन्स ऑफ वेल्स वस्तुसंग्रहालयास देण्यात आला. पाटलिपुत्राजवळील एका पुरातत्त्वीय संशोधन मोहिमेसाठी त्यांनी ७५,००० रु. दिले. रतनजींनी म. गांधींना द. आफ्रिकेच्या प्रचार दौऱ्यासाठी सव्वा लाख रु. दिले होते. नामदार गोखले यांच्या कार्याविषयी रतनजींना अपार श्रद्धा वाटत होती म्हणूनच अनेक वर्षे भारत सेवक समाजाला देणग्यांच्या रूपाने त्यांनी सतत मदत केली. दारिद्र्य व तदानुषंगिक सामाजिक समस्यांच्या अभ्यासाकरिता रतनजींनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ड पॉलिटिक्स' या संस्थेत एक रतन टाटा निधी व अध्यासन स्थापन केले. रतनजींनाही 'सर' हा बहुमान लाभला. कॉर्नवॉल (इंग्लंड) येथे वयाच्या अवघ्या ४७ व्या वर्षी रतनजी निधन पावले. मृत्यूसमयी त्यांच्या नावे उभारण्यात आलेल्या सर रतन टाटा ट्रस्ट या न्यासाकडे त्यांनी आपली सर्व वैयक्तिक संपत्ति दिली. त्या वेळी या न्यासाजवळ ८१ लक्ष रु. होते. ह्या न्यासाची बहुउद्देशीय कार्ये असून आतापर्यंत त्याने सु. दोन कोटी रुपयांचा विनियोग जनहितार्थ केला आहे त्यांपैकी जमशेटपूरच्या राष्ट्रीय धातुविज्ञान प्रयोगशाळेस ११ङ७५ लक्ष रुपयांची देणगी देण्यात आली आहे.

जहांगीर रतनजी दादाभाई टाटा (जे. आर. डी. टाटा) : (२९ जुलै १९०४ ). जमशेटजींच्या चुलतभावाचे (रतनजी दादाभाई) पुत्र व टाटा उद्योगसमूहाचे सध्याचे अध्यक्ष (१९७६). त्यांचा जन्म पॅरिसला झाला. १९२२ मध्ये टाटा सन्स लि. मध्ये ते साहाय्यक होते. १९२६ मध्ये ते एक संचालक झाले. १९३८ मध्ये टाटा उद्योगांचे अध्यक्षपद लाभले. भारतीय विज्ञान संस्थेच्या विधिसभेचेही ते अध्यक्ष आहेत. भारतात विमानचालकाचा परवाना मिळविणारे पहिले मानकरी म्हणून ते सर्वश्रुत आहेत. ३ मे १९३० रोजी त्यांनी इंग्लंडला एकट्याने विमानोड्डाण केले. त्यांच्या प्रेरणेने १९३२ साली टाटा सन्स लि. चा एक विभाग म्हणून टाटा एअरलाइन्सची स्थापना करण्यात आली. कराची मुंबई मार्गावरील पहिले उड्डाण स्वतः करून या कंपनीच्या कार्याचा त्यांनी सुरुवात केली (ऑक्टोबर १९३२). १९४६ मध्ये स्थापन झालेल्या एअर इंडिया लिमिटेडचे व १९४८ मध्ये स्थापण्यात आलेल्या एअर इंडिया इंटरनॅशनल लिमिटेडचे ते अध्यक्ष होते. नागरी हवाई वाहतुकीच्या राष्ट्रीयीकरणापासून (ऑगस्ट १९५३) एअर इंडिया इंटरनॅशनल निगमाचे ते अध्यक्ष आहेत. तसेच इंडियन एअरलाइन्स या अंतर्गत हवाई वाहतूक कंपनीचे ते सदस्य आहेत. भारतीय अणुऊर्जा आयोग, केंद्रीय सल्लागारी उद्योग परिषद, राष्ट्रीय अनुप्रयुक्त अर्थशास्त्र संशोधन परिषद यांचेही ते सदस्य आहेत. 'नॅशनल सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्ट्स' आणि 'टाट एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूट' चे अध्यक्ष. १९४८ साली ते संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत भारतीय प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले होते. मिलवॉकी (विस्कॉन्सिन) येथील 'नॅशनल असोसिएशन ऑफ फोरमन' या संस्थेने १९५३ मध्ये 'इंटरनॅशनल मॅनेजमेंट मॅन' (आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन प्रवीण) म्हणून त्यांचा गौरव केला. 'ऑफिसर ऑफ लीजन ऑफ ऑनर' म्हणून फ्रान्स सरकारनेही त्यांचा बहुमान केला (१९५४). भारत सरकारने १९५५ साली त्यांना पद्मविभूषण हा किताब दिला. मद्रास मॅनेजमेंट असोसिएशनने १९६९ साली त्यांना बिझिनेस लीडरशिप पुरस्कार दिला. जे. आर. डीं.नीही १९४४ मध्ये आपल्या नावाचा एक न्यास उभारला आहे. जमशेटजी, दोराबजी, रतनजी या पूर्वसूरींच्या सगळ्या उत्तम गुणांचा परिपाक जे. आर. डी. टाटा यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला आढळतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय उद्योगधंद्यांची स्थिती व गरजा या स्वतंत्र भारतातील तशा स्थिति–गरजांपेक्षा वेगळ्या आहेत. या नव्या परिस्थितीची यथार्थ जाणीव ठेवून जे. आर. डीं.नी टाटा उद्योगधंद्यांचा कालोचित विकास साधण्याची दृष्टी ठेवली आहे. जमशेटजींची कल्पकता, उपक्रमशीलता, साहसीपणा आणि दोरबजी–रतनजींचे कलाविद्यांचे व क्रीडेचे प्रेम त्यांच्यात आढळून येते. त्यांमुळे एक संपन्न, पुरोगामी, कलाविद्याप्रेमी असा हा माणूस टाटा घराण्याला ललामभूत ठरला आहे.

टाटा उद्योगसमूह हा १९५० पासून भारतातील सर्वांत मोठा उद्योगसमूह म्हणून गणला जाऊ लागला. या समूहात कापड–वस्त्रे, पोलाद व वीज, कृषिअवजारे व सामग्री, रेल्वेडबे व एंजिने, डिझेल ट्रक व अन्य अवजड सामग्री, रसायने, सिमेंट, खाद्यतेले, साबण व प्रसाधनवस्तू, मनोरंजनात्मक व इलेक्ट्रॉनीय उपकरणे इ. विविध प्रकारचे उत्पादन होत असते. ह्यांशिवाय पर्यटन उद्योग, हॉटेल उद्योग व विमाव्यवसाय ह्यांमध्येही टाटांची यशस्वी वाटचाल आहे. टाटा उद्योगसमूहाची रूपरेषा तसेच टाटा न्यासांच्या विविधांगी समाजोपयोगी कार्याचे स्वरूप रतन टाटा यांच्या ९ ऑक्टोबर ला निधनाने जगभरात पुन्हा पुन्हा चर्चेत आले.ज्यांचा जन्म कुठे? कधी?. कसा झाला ?. यांची माहिती नसलेल्या देवा देवीची म्हणती सांगण्यास मनुवादी प्रिंट चॅनल मीडिया थांबत नाही. विविध मालिकेतून आधुनिक तंत्रज्ञान वापरुन चमत्कार दाखविला जातो. पण सत्य दाखविल्या जात नाही त्यावर चर्चा होत नाही.त्यामुळेच बहुसंख्य समाज बांधव रीतिरिवाज परंपरा पार पाडतांना दिसतात.त्यात अशिक्षिता पेक्षा उच्च शिक्षित डॉक्टर,इंजिनियर,कॉम्प्युटर हाडवेअर सापटवेअर इंजिनियर मागे नाहीत.हेच मोठी शोकांतिका आहे.

टाटा कंपनीने आधुनिक तंत्रज्ञान वापरुन किती किती शोध लावले त्यावर सर्वसामान्य लोकांना माहिती सांगितली पाहिजे. त्यावर भर दिला जात नाही. पाण्यापासून वीज कशी निर्माण केली जाते. किती लोक सांगू शकतील?.फेब्रुवारी १९१५ पासून लोणावळा, वळवण,शिरोटा,ठोकरवाडी व मुळशी या पाच ठिकाणी असलेल्या धरणांच्या पाण्याचा उपयोग करून खोपोली,भिवपुरी व भिरा येथील वीजउत्पादन केंद्रे मुंबईला विजेचा पुरवठा करत होती.शाळेच्या माध्यमिक अभ्यास क्रमात त्यांची माहिती आहे.

भिरा पंप केलेले स्टोरेज युनिट हे भारतातील असे एकमेव सर्वात मोठे युनिट आहे आणि कदाचित भारतात पंपिंग आणि जनरेशन या दोन्ही मोडमध्ये कार्यरत असलेले एकमेव पंप केलेले स्टोरेज युनिट आहे.त्याच भिरा प्रकल्पावर मी १९९७ ला काम केले. १५ ऑगस्ट १९९७ ला पाईप लाईन फुटून मोठा अपघात झाला होता. हजारो गावे वाहून गेले होते. आशिया खंडातील पहिला प्रकल्प जो मुळशी धरणेचे पाणी खाली आणून वीज तयार करते.ते खालच्या धरणात पाणी गोळा होते. नंतर रात्री तेच पाणी वरच्या धरणात जाते.या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली पाहिजे.विज्ञानाने झपाट्याने प्रगती करीत असतांना आम्हाला रितीरिवाजने परंपरेने लक्ष्मी पूजनाचे महत्व विविध मार्गाने समजावून सांगितल्या जाते. त्यात ही ब्राह्मण बनीयचा धंदा डोळ्यासमोर ठेऊन ग्राहकांना आकर्षित केल्या जाते.मी टाटा कंपनीत काम करीत असतांना टाटाने कधी लक्ष्मी पूजन केल्याचा पुरावा मिळत नाही. म्हणूनच टाटा ग्रुप कंपनीचे संस्थापक जमशेटजी टाटा ते रतन नवल टाटा (२८ डिसेंबर १९३७ ते ९ ऑक्टोबर २०२४) हे एक भारतीय उद्योगपती आणि टाटा सन्सचे माजी अध्यक्ष होते. देशभक्ती व सामाजिक बांधिलकी यात देशात त्याची कोणीच बराबरी करू शकत नाही. टाटा चॅरिटेबल ट्रस्टचे नेतृत्व ते करीत होते.भारतातील दोन सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मभूषण (२०००) आणि पद्मविभूषण २००८ ला मिळाला होता.हा इतिहास लक्षवेधी आणि प्रेरणादायी तो तरुणांनी डोळ्यासमोर ठेऊन स्वताची आणि देशाची प्रगती केली पाहिजे.

************

सागर रामभाऊ तायडे
९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.
टाटा पॉवर कंपनी सेवा निवृत कर्मचारी.

# नकली वस्तुंच्या विक्रीमुळे सामान्य ग्राहक व शासनाची रोज होत आहे लुट!!

आजकाल नकली असलेल्या अनेक वस्तु मार्केटमध्ये विक्रीसाठी गर्दी करीत आहेत. कंपनीच्या वस्तू सोडून ह्या नकली वस्तु कमी भावात व दिसायला चांगल्या असल्यामुळे सामान्य ग्राहक या बनावट वस्तूच्या आकर्षणात गुरफटला जातो.परंतु यामुळे ग्राहकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान तर करुन घेतोच परंतु बाजारात मिळणाऱ्या ह्या नकली वस्तूचा जास्त फायदा दुकानदारांना मिळत असतो.त्यामुळे शासनाचा हजारो रुपयांचा कर सुद्धा हे नकली वस्तूंचे विक्रेते बुडवत असतात.या दोन्ही गोष्टींचा विचार केला असता बनावट वस्तू ही सामान्य ग्राहकांची त्याचप्रमाने शासनाची सुद्धा मोठ्या प्रमाणात दिवसाढवळ्या लूट करीत आहे.महाराष्ट्रात नकली वस्तू बनावट शहर म्हणून ज्याप्रमाणे उल्हासनगरचे नांव सर्वांच्या तोंडी आहे त्याचप्रमाणे अकोला जिल्ह्यामध्ये सिंधी कँप या परिसरामध्ये सर्वच प्रकारच्या बनावटी वस्तू तयार करून बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात विकल्या जात आहेत, हे सर्वश्रुत आहे. ह्याचेच उदाहरण म्हणजे अकोला पोलीसांनी पकडलेले बनावट काजू प्रकरण त्याचप्रमाणे प्रिया निळच्या नावाने अकोट फैलमध्ये तयार होत असलेले निळ्धा कारखाना इत्यादी अनेक उदाहणे या बनावट वस्तू विक्री करणाऱ्या लोकां जवळ सापडून येतात.दर्जेदार कंपन्यांच्या नांवाची बनावट करून बनावट वस्तू विक्रेते आपल्या वस्तूला नांवे देऊन, उत्पादन करुन ते बजारात विकली जातात परंतु हे सत्य आहे.

दुर्देवाने घरगुती वापराच्या किरकोळ वस्तू खरेदी करतांना ग्राहक त्यांच्या दर्जाकडे फारसे लक्ष देत नसेल, हे जर मान्य केले तरी विजेवर चालणारी अनेक उपकरणे सुद्धा आय.एस.आय.चा शिक्का असूनही बनावट निघतात.हे समजल्यावर ग्राहक कमालीचा संतापतो.विशेष म्हणजे या क्षेत्रातील तज्ञसुद्धा अनेकदा ही बनावटगिरी ओळखू शकत नाही.देशभरातील बाजारपेठेमध्ये असल्या अस्सल आणि नकली वस्तूंची इतकी सरमिसळ झालेली दिसून येते साधाभोळा ग्राहक त्यामुळे गोंधळून गेला आहे.ज्या कंपनीचा माल मागतो त्याच कंपनीचा माल त्याला मिळतो खरा,पण वेष्टनाच्या आत दडलेला माल कितपत अस्सल आहे.हे फक्त दुकानदारालाच माहित असते. कारण तो स्वस्त आणि महाग दोन्ही प्रकारचा माल विकत असतो.अनेक दर्जेदार कंपन्यांच्या दारुपासुन तर माणसाच्या सर्वसामान्य जीवनामध्ये उपयोगी पडणाऱ्या प्रत्येक वस्तू या बनावट तयार करून त्या बाजारात विकून लाखो रुपयांची कमाई दुकानदार,त्यांचे एजेंट व कारखानदारांना होत आहे.परंतु यामध्ये पिळल्या जात आहे सामान्य ग्राहक व शासन,कारण हे बनावट वस्तू तयार करणारे कारखानदार हे कोणत्याही प्रकारे शासनाचा कर(सीं )व इत्यादी ज्या काही शासकीय तिजोरीत भरावा लागणारा निधी शासनाला न देता तो सर्व निधी स्वतःच हडप करून बनावट वस्तू तयार करीत सामान्य ग्राहकाला आकर्षित करून व वेगवेगळ्या प्रकारचे योजना आनुन ग्राहकांसोबत शासनाला फसवित आहे. परंतु याविरुद्ध ग्राहक मंच, सामान्य ग्राहक एवढेच काय तर शासकीय यंत्रणेकडून सुद्धा या बनावट वस्तूविक्री करणाऱ्या कंपन्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई होतं नसल्यामुळे ते सर्रासपणे जनतेला चुत्या बनवत आहेत,मग त्यामध्ये चहाची पाडर,आंघोळीचा साबण,खाद्यतेल सौंदर्य प्रसाधने,पाकीट,डिटर्जंन पावडर,पाण्याच्या पिशव्या,टोमॅटो सूप,आजी अनेक हॉस्पिटल जात आहे.परंतु ज्या कंपनीच्या नावाने नकली वस्तु विकणाऱ्या बनावट कपन्यांचा माल देखील घाऊन भावाने भरपूर प्रमाणात मिळतो.

देशभरातून किरकोळ विक्रेते या मालाच्या जाळ्यात फसून कमी भाव असल्यामुळे फसत असतात.गंमत अशी आहे की कुठल्याही प्रसिद्ध कंपनीची वस्तू ही जर ९०० रुपयांत मिळत असेल तर तीच वस्तू बनावट कंपनीची असेल तर ती ५०० ते ६०० रुपयांत सुद्धा ग्राहकाला मिळतांना आढळते. मात्र कसलाही विचार न करता सामान्य ग्राहक ती खरेदी करतो व त्या वस्तूचा दर्जा कसा आहे हे त्याला ती वस्तू घरी नेल्यावरच समजते बनावट कंपनीचा माल देशभर जागो जागी असलेल्या व्यापाऱ्यांच्या आणि किरकोळ विक्रेत्यांमार्फत ग्राहकांपर्यंत पोहोचता केला जातो.त्या बनावट कंपन्यांचे सेल्समन व सुंदर अशा सेल्स गर्ल्सच्या माध्यमातून थेट विकतात.तसेच तेल-तुपाचे डबे अथवा बाटल्या भंगारवाल्यांना विकतात याचा परिणाम भंगारवाल्या जवळून हा माल नकली वस्तू तयार करणाऱ्या कंपनीकडे विकल्या जातो व त्यामध्ये ती कंपनी आपला माल टाकून नकली वस्तू भरुन आकर्षक पॅकींग करुन बाजारात विक्रीसाठी पाठवून देतात अनेक दुकानदार तेल अथवा सुप,बिस्किट,औषधे तसेच जीवनावश्यक गृहोपयोगी खाद्य पदार्थ व इतर वस्तू ख्यातनाम कंपनीची नांव पाहून खरेदी केली जातात. परंतु प्रत्यक्षात त्या वस्तू दर्जेदार कंपन्यांच्या असतातच असे नाही. हा माल स्वस्त दरात मिळत असल्यामुळे सामान्य ग्राहक त्याला बळी पडतो,तर काही मोठ्या कंपन्या आपली उत्पादन अथवा उत्पादनाचा काही भाग बाहेरुन तयार घेतात.अशा वेळी आपली काही सदोष उत्पादने ते विक्रेत्यामार्फत स्वस्त दरात बाजारात विकतात. आणखी एक आश्चर्याची बाब म्हणजे अनेक मोठ्या कंपन्यांची नांवें व ब्रँडेड छापले पॅकींग रॅपर अथवा ताडपत्र्या झोपड्यांच्या छतांसाठी अथवा फुटपाथवरील टपऱ्यांना झाकण्यासाठी वापरलेले आढळतात.हे अस्सल रॅपर जर कंपनीमधून बाहेर येऊ शकतात तर पाऊचसाठी छापलेले प्लॅस्टिकची शीट इत्यादी वेष्टन कंपनीबाहेर सहजपणे उपलब्ध होऊन नकली माल बाजारात यायला कोणतीच अडचण राहत नाही. सर्वसामान्य ग्राहक विशिष्ट बँडची उत्पादने वापरुन झाल्यावर त्याचे रॅपर्स,डबे, पाकीट,फोडूनन टाकताच फेकून देतात,त्याचप्रमाणे सुटे विकतात आणि त्याचे रिकामे टीन डबे भंगारवाल्याला विकून टाकतात.त्यामधून देखील अनेक बनावटी वस्तु बाजारात आणल्या जातात.त्यामुळे तेल-तुप याच्या टीनवर मुळ कंपनीचा रॅपर असला तरी उत्पादन मात्र नक्कली कंपनीचे असते.तेलाच्या टिना चा डबा फक्त सिल केलेल्या ठिकाणा वरूनच उघडता येतो व त्यामुळे नकली माल विकणारे तिथूनच बनावटी हेल डब्यात भरुन पुन्हा सिल लावून बाजारात सर्रास विक्रीला काढतात.त्यामुळे नकली वस्तू व असली वस्तू कोणती आहे हे ओळखतांना ग्राहक संभ्रमात पडतो.प्रसिद्ध व नामवंत कंपन्यांचे स्वतः चे व्यावसायीक खर्च अवाढव्या असतात. या कपन्या आपल्या अधिकाऱ्याना व व्यवस्थापकांना भरपूर वेतन व सुविधा देतात. जाहिराती व इतर प्रचाराणे नकली वस्तुंच्या विक्रीमुळे सामान्य ग्राहक हा फसवला जाऊ शकतो.

माध्यमावरही मुक्तपणे खर्च करतात त्याचं विक्री तंत्रज्ञान देखील महागडं असतं. परिणामी त्यांच्या वस्तू महाग असतात.काही कंपन्यांतर त्यांच्या नावावरच आपलं उत्पादन विकतात आणि ते खपतंही.याऊलट लहान कंपन्यांचे दुकानदारांना नकली कंपन्यांच्या वस्तू प्रसिद्ध कंपन्यांच्या ब्रँडेड नावाने विकल्यास चांगलाच नफा होतो. म्हणून दुकानदार हेतुपुरस्सर त्यांच्या दुकानातून नकली बँडच्या वस्तू विकतात.काही दुकानदार तर असली उत्पादन पूर्व सर्व खर्च कमी असतात.जाहिराती प्रसार साधनांवर त्यांचा खर्च कमी होतो.त्यामुळे त्यांचे उत्पादन स्वस्त पडते. परंतु किरकोळ विक्रेते या वस्तूंपासून कमीशन जास्त मिळत असल्यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणात विकतात तर नामवंत कंपन्यांच्या उत्पादनावर उत्पादन कर,विक्रीकर लावले जातात.परंतु मामुली कंपन्यांना या प्रकनाची कसलीच डोकेदुखी नसते.त्यामुळे ते स्वस्त दरात या वस्तू विक्री करुन जास्तीत जास्त नफा मिळवून ग्राहकांसोबत शासनाची लुबाडणुक करीत असतात.ग्राहकसुद्धा भव्य जाहिरातीमुळे आकर्षित होवून अथवा एखाद्या परिचित व्यक्तीकडून प्रशंसा ऐकून एखाद्या नामवंत कंपनीची वस्तू जेव्हा ग्राहक खरेदी करतो आणि प्रत्यक्षात ती वस्तू मुळ कंपनीच्या ब्रेडची नसून बनावट कंपनीची असल्याची जाणीव त्याला होते तेव्हा ती ग्राहकाची झालेली फसवणूकच असते.या गोष्टीकडे सरकारने देखील व नकली अशा दोन्ही प्रकारचे माल ठेवतात. जसा ग्राहक, येईल त्याचप्रमाणे त्याला बँड दिला जातो.अस्सल मुळ कंपनीची वस्तू विकल्यास किरकोळ विक्रेत्याला दहा ते पंधरा टक्के नफा होत असेल तर बनावट कंपन्यांच्या वस्तू विकल्यास ५० टक्क्यांप्रमाणे नफा त्याला मिळत असतो. त्यामुळे जास्त नफा मिळत असल्यामुळे हे दुकानदार बनावटी वस्तूंच्या विक्रीसाठी नेहमी पुढेच असतात.नकली बँडच्या बाबतीत आणखीन एक महत्वाची बाब म्हणजे वस्तूच्या गुणवत्तेनुसार तिची किंमत देखील वेगवेगळी असते.

अतिशय हलक्या वस्तूची किंमत कमी असते तर त्याहून चांगल्या दर्जाच्या वस्तूची किंमत थोडी अधिक असते.तरी देखील नकली ब्रेडची सर्वांत चांगली व महागवस्तू देखील अस्सल बँडच्या दर्जाशी टक्कर देऊ शकत नाही, कारण त्या वस्तूची तांत्रिक निर्मिती मूल्य मोठ्या कंपनीसारखी नसते.स्पर्धेमुळे नकली बँड आपल्या दुकानात मुद्दाम ठेवतात.जेणेकरून ग्राहक त्या दुकानदाराला स्वस्त दरात अथवा योग्य भावात विक्री करणारा दुकानदार समजून नेहमी त्याच्याकडे माल घेण्यास ग्राहकाने यावे.याकरिता हे दुकानदार हा नकली माल आपल्या दुकानात ठेवून विक्री करीत असतात. सामान्य ग्राहक अस्सल बँडसारखीच नावं आणि त्याच्या सारख्याच वेष्टनामुळे फसत असतो व कमी किंमतीत या नकली वस्तू घेवून आर्थिक रित्या सुद्धा फसतो व स्वतःची फसवणूक स्वतःच करीत असतो. याकडे लक्ष द्यायला हवे. याबाबत ग्राहक मंचाने सुद्धा कडक धोरण स्वीकारणे व नकली बँड बाजारातून नाहीसे करण्याकरिता शासकीय यंत्रणेनेसुद्धा मोठ्या प्रमाणात मोहीम उघडणे आवश्यक आहे. कारण यामुळे नकली कंपन्यांनी आपले उत्पादन मोठ्या कंपन्यांच्या नावाखाली विकल्यामुळे सरकारला विक्रीकर,उत्पादन कर जी एस टी इतर कर तर मिळत नाहीच शिवाय त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था देखील खिळखिळी होते.म्हणून याबाबतीत प्रसिद्ध मुळ कंपन्या ग्राहक व सरकार यांनी सावधगीरी बाळगण्याची नितांत गरज आहे.

ग्राहकांनी देखील जाणीवपूर्वक नकली बँड विकणाऱ्या दुकानावर बहिष्कार घालायला हवा.तसेच विशिष्ट ब्रेडच्या उत्पादकाच्या कंपनीला ही माहिती त्वरीत पाठविली पाहिजे.अस्सल बँडची विक्री करणाऱ्यांना अडचण असते ती फक्त त्यांच्या भारी किंमतीची.परंतु वस्तुस्थिती ही की,नकली माल विकणाऱ्यांची विक्री अधिक होते. शिवाय बाजारात त्यांची प्रतिष्ठा असते, नकली ब्रब्रँडचा दर्जा अस्सल ब्रँडसारखा नसल्यामुळे चोखंदळ ग्राहकाला दर्जामध्ये फरक लगेच दिसून येतो. त्यामुळे नकली माल चुकून खरेदी केल्यावर ग्राहक तर तक्रार करील अथवा त्या दुकानातून भविष्यात कधी खरेदी करणार नाही.शिवाय चांगल्या दर्जाची वस्तू अस्सल ब्रेडची विक्री करण्यात जे समाधान आत्मसन्मान व अभिमानाची जाणीव होते ती इतर कोणत्याही बनावटी क्स्तू विक्री केल्याने मिळत नाही. परंतु दुर्देवाने या सर्व गोष्टी आज ग्राहकांनी दुर्लक्षित केल्यामुळे व दुकानदारांना अधिक नफा मिळत असल्यामुळे याचा ध्यास या दुकानदारांनी व घरोघरी जावून विक्री करणाऱ्या सेल्समननी घेतला आहे.या सर्व बाबींचा विचार केल्यास नकली वस्तू विक्री करणारा जेवढा दोषी आहे तेवढाच दोषी या बनावट वस्तूच्या आकर्षणात गुंतलेला ग्राहक सुद्धा याला कारणीभूत आहे. त्याच प्रमाणात ह्या वस्तू बनविणाऱ्या कंपन्या तर कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन कसे मिळेल या भावनेनेच व्यवसाय करीत असतात.अशा या चक्रव्यूहा मध्ये लूट होत आहे ती सामान्य ग्राहक व शासनाची,ती केव्हा थांबणार,याकडे सवांचे लक्ष असून त्या दृष्टीने ग्राहक चळवळ याबाबत काय पवित्र घेते यावरच बनावट वस्तूंच्या कंपन्यांचे भवितव्य कंपन्यांचे भवितव्य अवलंबून आहे याला आळा घालण्याकरिता ग्राहकां पासून तर शासकीय यंत्रणे पर्यंत सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

जेणेकरून ती कंपनी त्या नकली निर्मात्याविरुद्ध कारवाई करु शकेल आणि वापरलेल्या बँडच्या पॅकींग, साहित्य,बाटल्या,रॅपर,रिकामे पाऊच,डबे नष्ट करुन बाहेर फेकल्या पाहिजे.खुद्द या नामवंत कंपनीने देखील आपले निरीक्षक दुकानात पाठवून एखादा दुकानदार त्यांच्या बँडसारखा नकली ब्रेड विकतो की काय याची खात्री करुन घ्यावी. तरच अशा या बनावट वस्तू विक्रीला आळा बसू शकेल.यालाही मोठे कारण म्हणजे चांगल्या कंपनीचे चुकीचे धोरण हेच आहे.चांगल्या व प्रसिद्ध कंपन्या कोट्यावधी रुपये जाहिराती व इतर प्रचार साधन,व्यवस्थापनावर मुक्तपणे खर्च करतात.परंतु याच कपन्याचे आपले बँड विकणाऱ्या विक्रेत्याला नाममात्र कमीशन देतात.दुकानदारांना त्यामधून विजेचे बिल, दुकानाचे भाडे नोकराचा पगार इत्यादी खर्च भागवायचां असतात.त्यामुळे दुकानदारांना नकली बँडची विक्री करण्यास ते भाग पाडतात.याबाबतीत एक प्रसंग आठवततो म्हणजे एका दुकानात एक ग्राहन एका विशिष्ट कंपनीच्या ब्रँडचे तेल न्यायला आला. त्या दुकानदारा त्या बाटलीवर छापलेल्या किंमती पेक्षा ५० पैसे कमी करून ३२ रुपयात ग्राहकाकडे मागितले. त्यावर तो ग्राहक म्हणाला, इतर दुकानदार तर हिच बाटली २० रुपयांना विकतात,तेव्हा त्या दुकानदाराने ती बाटली २० रुपयास देण्यास नकार दिला.त्यामुळे तो ग्राहक परत गेला, वास्तविक त्या ग्राहकाला काय माहित की त्या विशिष् अस्सल बँडचे तेल २२ रुपयांना विकल्यानंतर त्या दुकानदाराला फक्त २ रुपयेच नफा मिळतो. त्यामुळे उघडच आहे की, बाटली २० रुपयांना विकणारा दुकादनार नकली ब्रेडची विक्री काढतो व अस्सल बँडपेक्षा अधिक नफा मिळवितो. अशाप्रकारे या स्पर्धेच्या युगात शासन व ग्राहकाला लुटण्याचे काम त्या कंपन्या व त्यांचे दलाल करीत आहेत यावर कारवाई करण्याची गरज आहे.

*********

गजानन हरणे,संवाद......
९८२२९४२६२३.
जिल्हा परिषद नगर खडकी बु.अकोला.
समाजसेवक तथा संयोजक,निर्भय बनो जन आंदोलन महाराष्ट्र राज्य.

# आयुष्यात कधीच निर्माण होणार नाही हार्ट अटॅक व स्ट्रोकची समस्या, नियमित करा 'या' पदार्थांचे सेवन

जगभरात हार्ट अटॅक, स्ट्रोक, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी अनेक गंभीर आजारांचे रुग्ण आहेत. चुकीच्या जीवनशैलीचा परिणाम आरोग्यावर दिसू लागल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक गंभीर समस्या उद्भवण्यास सुरुवात होते. त्यामुळे शरीराला पचन होणाऱ्या आणि हेल्दी पदार्थांचे सेवन करावे. हार्ट अटॅक, स्ट्रोक, मधुमेह, उच्च रक्तदाब हे आजार पूर्वीच्या काळी वृद्धांचं होत होते. मात्र हल्ली तरुण पिढीला सुद्धा हे आजार होऊ लागल्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. हृदयाचे आरोग्य बिघडल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. तसेच हृदयाच्या निरोगी आरोग्यासाठी आहारात पौष्टिक पदार्थांचे सेवन केल्यास शरीराला अनेक फायदे होतात. शरीरात वाढलेले कोलेस्ट्रॉल, उच्च रक्तदाब कमी करण्यासाठी आहारात कोणत्या पदार्थांचे सेवन करावे, याबद्दल सांगणार आहोत. हे पदार्थ खाल्यामुळे हार्ट अटॅक, स्ट्रोक, उच्च रक्तदाब इत्यादी आजरांपासून दूर राहता येते. निरोगी जीवन जगण्यासाठी आहारात 'या' पदार्थांचे करा सेवन: ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स: ओमेगा-३ फॅटी ॲसिड्सयुक्त मासे आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहेत. या माशांचे सेवन केल्यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते. सॅल्मन, टूना आणि मॅकेरल इत्यादी अनेक माशांमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स मोठ्या प्रमाणावर आढळून येते. त्यामुळे रोजच्या आहारात या माश्यांचे सेवन करावे. या माशांचे सेवन केल्यामुळे रक्तदाब कमी होतो, शिवाय हृदयाच्या शिरांमध्ये कोलेस्टेरॉल वाढत






नाही.ओमेगा-३ फॅटी ॲसिड्सयुक्त मासे खाल्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. नट्सचे सेवन करावे: रोजच्या आहारात काजू, बदाम, अक्रोड, काळ्या मनुका इत्यादी नट्सचे सेवन करावे. या नट्सचे सेवन केल्यामुळे शरीराला आवश्यक घटक मिळण्यास मदत होते. या पदार्थांमध्ये हेल्दी फॅट्स, प्रोटीन आणि फायबर इत्यादी गुणधर्म आढळून येतात. अक्रोड खाल्यामुळे मेंदूचे कार्य सुधारण्यास मदत होते. शिवाय अल्फा-लिनोलेनिक ॲसिड हृदयाच्या आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. अक्रोडाचे सेवन केल्यामुळे हृदयाच्या नसांमध्ये कोलेस्ट्रॉल साचून राहत नाही.

हिरव्या पालेभाज्या: हिरव्या पालेभाज्या खाण्यास मुलं नेहमीच नकार देतात. पण हिरव्या पालेभाज्या आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहेत. या भाज्यांचे सेवन केल्यामुळे आरोग्यासंबंधित अनेक आजार बरे होतात. हिरव्या पालेभाज्यांमध्ये विटामिन के, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि फायबर इत्यादी घटक आढळून येतात. हिरव्या पालेभाज्यांचे सेवन केल्यामुळे रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहण्यास मदत होते. पालेभाज्यांमधील अँटीऑक्सिडंट्स आणि फ्लेवोनॉइड्स घटक हृदयाच्या नसा मजबूत होतात. लसूण: जेवणातील पदार्थांची चव वाढवण्यासाठी आणि सुगंध वाढवण्यासाठी लसूणचा वापर केला जातो. लसूण खाल्यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते. लसूणमध्ये असलेले ॲलिसिन उच्च रक्तदाबाच्या समस्येवर अतिशय गुणकारी आहे. रोज सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी कच्चा लसूण चावून खाल्यास शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहण्यास मदत होते. शिवाय हृदयावरील ताण कमी होतो. त्यामुळे रोजच्या आहारात लसूणचे सेवन करावे.

# मेटास्टॅटिक ब्रेस्ट कॅन्सरसह निदान झाले आहे पुढे काय केले पाहिजे, रूग्णाच्या प्रश्नावर तज्ज्ञांचा खुलासा

भारतात, स्तनाचा कर्करोग हा सर्वात निदान होणारा कर्करोग आहे. आपल्यापैकी बहुतेकजण अशा व्यक्तींना ओळखतात, ज्यांनी स्तनाचा कर्करोगाविरोधातील आव्हानात्मक संघर्षाचा सामना केला आहे. कुटुंबातील सदस्य, मित्रमैत्रिण किंवा सहकारी असो, त्यांचे अनुभव या आजाराच्या घातक वास्तविकतेची जाणीव करून देतात. मेटास्टॅटिक ब्रेस्ट कॅन्सरचा सामना केलेल्या व्यक्तींच्या प्रवासामधून जीवन, कुटुंब व समुदायांवर या आजाराच्या परिणामाची आठवण होते, ज्यामुळे या आजाराबाबत जागरूकता व पाठिंब्याचे महत्त्व अधिक प्रकर्षाने दिसून येते.

सह्याद्री हॉस्पिटल्सच्या मेडिकल ऑन्कोलॉजीचे कन्सल्टण्ट डॉ. तुषार पाटील म्हणाले, वर्षानुवर्षे मी निरीक्षण केले आहे की, जवळपास ३० टक्के रूग्ण मेटास्टॅटिक ब्रेस्ट कॅन्सरच्या लक्षणांबाबत समज व गैरसमजांना बळी पडतात. रूग्ण व केअरगिव्हर्सनी उपचार पर्याय व निष्पत्तींबाबत अर्थपूर्ण संवाद साधणे, तसेच मेटास्टॅटिक ब्रेस्ट कॅन्सरसह जगण्याच्या गुंतागुंतींमधून नेव्हिगेट करणे महत्त्वाचे आहे. केमोथेरपीपासून प्रगत उपचार पर्यायांपर्यंत जोखीम घटक आणि मेटास्टॅटिक ब्रेस्ट कॅन्सरच्या व्यवस्थापनामधील अद्वितीय आव्हानांबाबत माहित असले पाहिजे. रूग्णांनी अचूक माहितीसह स्वत:ला खंबीर केले पाहिजे आणि योग्य उपचार योजनेची निवड केली पाहिजे, जी त्यांच्या जीवनाचा दर्जा व जीव वाचण्याची शक्यता सुधारेल. मेटास्टॅटिक ब्रेस्ट कॅन्सरबाबत पाच समज आहेत. खाली काही टिप्स देण्यात आल्या आहेत, ज्या मेटास्टॅटिक ब्रेस्ट कॅन्सरचे योग्यरित्या व्यवस्थापन करण्यास मदत करू शकतात:



निदानाबाबत जाणून घ्या: आजाराबाबत अधिक उत्तमपणे जाणून घेण्यासाठी हेल्थकेअर टीमसोबत खुल्या मनाने सल्लामसलत करा, शंका विचारा. प्रगत थेरपीजसह सर्व उपचार पर्यायांचा शोध घ्या आणि संभाव्य प्रतिकूल परिणामांबाबत जाणून घ्या.

सर्वोत्तम उपचाराची निवड करा: मेटास्टॅटिक ब्रेस्ट कॅन्सरसाठी प्रत्येक थेरपी उपचाराचे स्वत:चे प्रतिकूल परिणाम असतात. पण, लक्ष्यित थेरपीज व इम्यूनोथेरपीसह उपचार पर्यायांमध्ये सुधारणा होण्यासह रूग्णांना अधिक पर्याय उपलब्ध आहेत. तुमच्यासाठी योग्य असलेल्या उपचार पर्यायांबाबत डॉक्टरांचा सल्ला घ्या.

सपोर्ट सिस्टम तयार करा: जिवलग कुटुंबिय व मित्रांना निदानाबाबत सांगा, कारण त्यांच्या पाठिंब्यामुळे तुम्हाला उपचार प्रवासादरम्यान स्थिरता निर्माण होण्यास मदत होईल. तसेच, अशाच आव्हानांचा सामना करत असलेल्या इतर व्यक्तींशी कनेक्ट होण्याकरिता स्थानिक सपोर्ट ग्रुप्स किंवा ऑनलाइन समुदायांमध्ये सामील व्हा. अनुभवांची देवाणघेवाण केल्याने बहुमूल्य माहिती मिळू शकते आणि भावनिक ताण कमी होण्यास मदत होऊ शकते.

एकूण आरोग्यावर लक्ष केंद्रित करा: कर्करोगावरील उपचाराच्या प्रवासादरम्यान संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि पुरेशी झोप यासह आरोग्यदायी जीवनशैली राखण्यासाठी स्वत:ची काळजी घेण्याला प्राधान्य द्या. चिंतन किंवा योग यासारख्या तणाव दूर करणाऱ्या तंत्रांचा अवलंब करा आणि आरामदायीपणा व उत्साह देणारे क्रियाकलाप करण्यासाठी वेळ काढा, ज्यामुळे भावनिक व शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहण्यास मदत होईल. आर्थिक नियोजन: उपचारासाठी होणारा खर्च जाणून घेण्यासोबत आर्थिक सहाय्यक पर्यायांचा शोध घेण्यासाठी डॉक्टर्स व विमा प्रदात्यांसोबत सल्लामसलत करा. तसेच, परिवहन ते अपॉइण्ट्समेंट्स, चाइल्डकेअर गरजा आणि कामाच्या स्थितीनुसार कोणतेही आवश्यक समायोजन अशा व्यावहारिक घटकांचा विचार करा.

# सर्वात बेस्ट तांदूळ कोणते? ने दिले उत्तर, रोखू शकता कॅन्सर

तांदूळ हे भारतात सर्वात जास्त वापरले जाणारे अन्न आहे. तांदळाचे वेगवेगळे प्रकार आहेत आणि प्रत्येकाची चव आणि फायदे वेगळे आहेत. अशा वेळी अनेक वेळा प्रश्न पडतो की कोणता तांदूळ चांगला आहे किंवा कोणता तांदूळ आरोग्यासाठी चांगला आहे? भारतातील विविध राज्यात विविध प्रकारचे तांदूळ आढळतात. तांदूळ तयार करणे सोपे आहे, तांदूळ हा कार्बोहायड्रेट्सचा एक उत्तम स्रोत आहे, जो शरीराला त्वरीत ऊर्जा प्रदान करतो. याशिवाय भातामध्ये फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स आढळतात. ईशा फाउंडेशनचे संस्थापक सद्गुरु जग्गी वासुदेव यांनी उत्तम तांदूळ कोणता याबाबत सांगितले आहे. त्यांनी काळ्या कवुनी तांदूळाचे त्यांनी उत्तम वर्णन केले आहे. मुळात तामिळनाडूमध्ये लागवड केलेल्या काळ्या तांदळाचा हा एक प्रकार आहे. हा अनोखा तांदूळ भरपूर पोषक आहे आणि तो खाल्ल्याने अनेक आरोग्य फायदे मिळतात, कसे ते जाणून घ्या (फोटो सौजन्य - ळडींलज्ञ/खर्पींरसीरा) ब्लॅक तांदळातील पोषक तत्व सद्गुरूंनी काळ्या तांदळाचे वर्णन 'काळी जादू' म्हणून केले आहे कारण त्यात शरीरासाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक असतात. ते खाल्ल्याने प्रथिने, लोह आणि फायबरसारखे पोषक घटक मिळतात. यामुळे शरीराला विविध फायदे मिळतात असंही त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे आपल्या आहारात या ब्लॅक राईसचा समावेश करून घ्यावा.





कावुनी तांदळाचे गुण कावुनी तांदळात आढळणारे अँटीऑक्सिडंट्स, अँथोसायनिन्स आणि फायबर एलडीएल कोलेस्टेरॉलची पातळी कमी करून रक्त प्रवाह सुधारतात आणि हृदयविकाराचा धोका कमी करण्यास मदत करतात. याच्या सेवनाने कोरोनरी आर्टरी डिसीजपासून बचाव होतो. हे तांदूळ तामिळनाडू राज्यात जास्त मिळतात. मात्र संपूर्ण देशात त्याचा पुरवठा केला जातो. त्यामुळे तुम्हीही त्याचा उपयोग करून घ्यावा. कॅन्सर टाळण्यासाठी अँथोसायनिन्स नावाचे घटक काळ्या तांदळात अधिक प्रमाणात आढळतात, जे शरीरातील सूज कमी करण्यास आणि दाहक विकारांपासून संरक्षण करण्यास मदत करतात. याच्या नियमित सेवनाने कर्करोग, विशेषतः स्तनाचा कर्करोग टाळता येतो असेही त्यांनी आपल्या व्हिडिओमध्ये सांगितले आहे. त्यामुळे कर्करोगापासून दूर राहायचे असेल तर आहारात याचा समावेश करून घ्यावा. अँटीऑक्सिडंट्सयुक्त काळ्या कावुनी तांदळात अँथोसायनिन्सचे प्रमाण जास्त असते, त्याचा गडद रंग हा अँटीऑक्सिडंटमुळेच आलेला आहे. या कावुनी तांदळात २३ प्रकारचे अँटीऑक्सिडंट आढळतात, जे शरीरातील फ्री रॅडिकल्सशी लढण्यास मदत करतात आणि कर्करोग, हृदयविकार आणि वय संबंधित समस्यांसारख्या जुनाट आजारांचा धोका कमी करतात. वजन आणेल नियंत्रणात फायबरच्या चांगल्या प्रमाणामुळे काळा तांदूळ उत्तम ठरतो आणि भूक नियंत्रित करण्यास मदत करतो, जे वजन नियंत्रणासाठी फायदेशीर आहे. त्यात असलेल्या फायबरमुळे, ते नियमित आतड्यांसंबंधी हालचालींना प्रोत्साहन देते, बद्धकोष्ठता प्रतिबंधित करते आणि आतड्यांसंबंधी आरोग्यास प्रोत्साहन देते. ज्यामुळे पचनक्रिया चांगली राहते आणि तुमचे वजन झर्रकन वाढत नाही आणि नियंत्रणात राहण्यास मदत मिळते. हिमोग्लोबिनसाठी वरदान काळ्या कावुनी तांदळात भरपूर लोह असते, जे हिमोग्लोबिन तयार करण्यासाठी आणि अशक्तपणा टाळण्यासाठी आवश्यक आहे, विशेषत: लोहाच्या कमतरतेने ग्रस्त असलेल्यांसाठी याचा अधिक उपयोग होतो. ब्लॅक तांदळाच्या सेवनाने मधुमेही रुग्णांमध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

# संवाद आपुलकीचा, जनसामान्यांच्या विश्वासाचा..!

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांचा केज मतदारसंघात झंझावाती जनसंपर्क दौरा ; सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद**

केज /प्रतिनिधी संवाद आपुलकीचा, जनसामान्यांच्या विश्वासाचा हे ब्रीद घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी गुरूवार, दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी केज मतदारसंघात झंझावाती जनसंपर्क दौरा केला. माजी आमदार साठे यांना सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी गुरूवारी केज मतदार संघातील मुलेगाव येथे भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला व मतदानरूपी आशिर्वाद देवून सहकार्य करावे असे आवाहन केले. यावेळी गावातील नागरिक महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार माजी आ.पृथ्वीराज साठे हे केज मतदारसंघातील केकतसारणी (ता.केज) येथे गांवकरी बांधवांशी भेट देत जेष्ठ नागरिकांचे आशीर्वाद घेतले. व आगामी विधानसभा निवडणुकीत मला मतदानरूपी आशिर्वाद देऊन सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच केज मतदार संघातील कळंबअंबा या गावाला भेट देऊन उपस्थित नागरिकांशी दिपावली निमित्ताने शुभेच्छा दिल्या. व त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला. मान्यवरांची उपस्थिती आणि जनतेचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रमात नवा उत्साह निर्माण झाला. हा विश्वास आणि आपले सहकार्य असेच कायम राहो. आपले मतदानरूपी आशीर्वाद कायम सदैव पाठीशी राहु द्या असे आवाहन केले. यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यासोबतच साठे यांनी आज सकाळी केज मतदारसंघातील बनकरंजा (ता. केज) या गावात भेट दिली. ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी त्यांच्याशी चर्चा केली. गावात



जाताच गावाकऱ्यांनी केलेलं जंगी स्वागत पाहून मी भारावून गेलो. असे साठे यांनी सांगितले तर आम्ही तुमच्या सोबत आहोत हे त्यांचे शब्दचं मला ताकदीने लढायला बळ देऊन गेले. असे माजी आमदार साठे म्हणाले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी केज विधानसभा मतदारसंघातील होळ व लाडेगाव या गावांना ही भेट देऊन गावकऱ्यांचे आशीर्वाद घेतले. जनतेसाठी नि:स्वार्थपणे काम करीत आलो आहे. याची आज पोचपावती, ग्रामस्थांकडून मिळत आहे. आपले हे प्रेम आणि आशिर्वाद असाच सदैव पाठीशी राहावा. यावेळी गावकऱ्यांनी केलेल्या सत्काराचा आपण स्वीकार केला असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी दिली. या संपूर्ण झंझावाती जनसंपर्क दौऱ्यात माजी आमदार साठे यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तसेच महाविकास आघाडी घटक पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी किनवटमध्ये महिलांची स्वीप प्रश्नमंजुषा

किनवट/शेख शौकत :-मतदार जनजागृती (स्वीप) कक्षाच्या वतीने महिला मतदारांच्या मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी किनवट मध्ये महिलांची प्रश्नमंजुषा (स्वीप क्वीझ) आयोजित करण्यात येत आहे. याला शहरी भागासह ग्रामीण भागातून प्रचंड प्रतिसाद मिळत असून याप्रसंगी महिलांकडून आम्ही मतदान करणारच असे अभिवचन मिळत आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीप नोडल प्रमुख मीनल करणवाल यांच्या मार्गदर्शनाखाली ८३-किनवट विधानसभा मतदार संघात सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना यांच्या संकल्पनेतील मतदार जनजागृती स्वीप कक्षाच्या वतीने महिलांची प्रश्नमंजुषा (डतएएझ टणखन) आयोजित करण्यात येत आहे. गट शिक्षणाधिकारी तथा कक्ष प्रमुख गंगाधर राठोड यांच्या नेतृत्वात सिद्धार्थनगर, गोकुंदा येथे महिलांच्या मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महिलांची प्रश्नमंजुषा (स्वीप कीझ) घेण्यात आली. मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या माया सुरेश कसबे सुनिता अनिल उमरे, इंदूताई कनिंदे, गंगानगर किनवट येथे छाया शंकर बहादुरे, अंजली विशाल मेटकर सूर्यकांता भानुदास नरवाडे,



सारखणी येथे सुनिता राहूल भवरे यांना स्वीप क्वीझ स्टीकर स्वीप क्विझ स्टीकर लावून भेट वस्तू देण्यात आल्या. यावेळी महिला मतदारांनी उत्स्फूतपणे मी मतदान करणारच असे अभिवचन दिले. याप्रसंगी स्वीप सदस्य केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे, उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे, प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी, रमेश मुनेश्वर, सुरेश पाटील, रुपेश मुनेश्वर, शेषराव पाटील, सुरज पाटील, भूमय्या इंदूरवार, सारंग घुले, सचिन कोंडापलकुलवार, मल्लिकार्जुन स्वामी, बीएलओ यमुना राठोड, राजू भातनासे, विनोद गुरनुले व महिलांसह बहुसंख्य होते. मतदार उपस्थित होते.

## धोनी यंदाही खेळणार, क्लासेन महागडा खेळाडू

मुंबई : प्रतिनिधी आयपीएलमधील १० संघांनी आयपीएलच्या मेगा लिलाव-२०२४ साठी खेळाडू कायम ठेवण्याची यादी जाहीर केली. ५ वेळा चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्सने ५ खेळाडूंना कायम ठेवले. माजी कर्णधार एमएस धोनी चेन्नईकडून अनकॅप्ड खेळाडू म्हणून खेळणार आहे. दिल्ली कॅपिटल्सने कर्णधार ऋषभ पंतला सोडले. पंत २०१६ पासून दिल्लीसोबत होता. लखनौ सुपर जायंट्सने केएल राहुलला सोडले, कोलकाता नाइट रायडर्सने कर्णधार श्रेयस अय्यरला सोडले आणि बंगळुरूने फाफ डू प्लेसिसला सोडले. यात सनरायजर्सने हेनरिक क्लासेनसाठी तब्बल २३ कोटी रुपये मोजले आहेत. त्यामुळे खेळाडू कायम करण्याच्या प्रक्रियेत तो महागडा खेळाडू ठरला. मुंबई इंडियन्स संघाने गेल्या वर्षीच्या हंगामापूर्वी एका धक्कादायक निर्णय घेतला. पाच जेतेपद मिळवून देणा-या रोहित शर्माऐवजी मुंबईने हार्दिक पांड्याची कर्णधार म्हणून नियुक्ती केली. हार्दिकने मुंबई इंडियन्समधूनच आयपीएल कारकिर्दीला सुरुवात केली. पांड्याने मुंबईच्या जेतेपदांमध्ये मोलाची भूमिका बजावली. त्यानंतर तो गुजरात संघाचा कर्णधार झाला. मात्र, गेल्या वर्षी तो मुंबई संघात परतला. हार्दिककडेच मुंबई संघाची सूत्रे असल्याने रिटेन्शन यादीत तो आहे. हार्दिक पांड्याला १६.३५ कोटींची रिटेंशन किमत आहे. रोहित शर्मालाही रिटेन केले. त्यालाही १६ कोटी रुपये मोजले. यासोबतच सूर्याला मुंबईने १६.३५ कोटींना रिटेन केले तर तिलक वर्माला ८ कोटी मोजले. यात बुमराहला सर्वाधिक १८ कोटी मोजले. धोनी अनकॅप्ड खेळाडू पाच वेळचा आयपीएल चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्स संघामध्ये अनेक स्टार आणि दिग्गज खेळाडू आहेत. त्यामुळे चेन्नई सुपरकिंग्ज कोणाला रिटेन करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर ऋतुराज गायकवाड, रवींद्र जडेजा, मथिशा पाथिराना, एमएस धोनी आणि शिवम दुबे यांना रिटेन करण्यात आले.

रॉयल चॅलेंजर्सची धुरा पुन्हा विराटकडे?

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ नव्याने संघ उभारणी करणार आहे. दक्षिण आफ्रिकेच्या फाफ डू प्लेसिसने संघाचे नेतृत्व सांभाळले आहे. त्याचा फिटनेस उत्तम आहे. मात्र तो चाळिशीत आला आहे. त्यामुळे संघाने भविष्याचा विचार करता फाफ डू प्लेसिसला रिलीज केले आहे. त्यामुळे बंगळुरू पुन्हा विराटकडे नेतृत्वाची धुरा सोपवू शकते. सनरायजर्सने क्लासेनला केले रिटेन

सनरायझर्स हैदराबादच्या ट्रॅव्हिस हेड, हेनरिक क्लासेन आणि अभिषेक शर्मा यांनी अक्षरक्ष: धुमाकूळ घातला. कमीत कमी चेंडू, जास्तीत जास्त धावा चोपण्यात हे त्रिकूट माहीर आहे. त्यामुळे संघाने कमिन्स, क्लासेन, हेड आणि अभिषेक शर्मा यांना रिटेन केले. यात हेनरिक क्लासेनला सर्वाधिक २३ कोटी रुपये मोजले.

## लातुरातील गुळ मार्केट चौकात बसने दुचाकीस्वारास चिरडले

लातूर : निलंगा आगाराच्या शिवशाही बसने एका दुचाकी चालकाला चिरडल्याची घटना गुळ मार्केट चौकात गुरुवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडला. यामध्ये दुचाकीस्वार जागीच ठार झाला असून याबाबत गांधी चौक पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. जाफर युसूफ सय्यद (वय ५९ रा. आलमपुरा, शाम नगर, लातूर) असे मयत दुचाकीचालकाचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले, लातूर येथील मध्यवर्ती बसस्थानकातून निलंग्याकडे निघालेली शिवशाही बस (एम.एच. ०६ बी.डब्ल्यू. ०८९६) लातुरातील गुळमार्केट चौकात गुरुवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास आली. यावेळी दुचाकीवरुन (एम.एच. २४ बी.बी. २७७५) निघालेल्या जाफर युसूफ सय्यद यांची दुचाकी बसच्या समोरील चाकाखाली आली. यामध्ये दुचाकीचालक जाफर सय्यद हे बसने चिरडल्याने जागीच ठार झाले. घटनास्थळी गांधी चौक ठाण्याच्या पोलिसांनी भेट देऊन पंचनामा केला. याबाबत गांधी चौक पोलिस ठाण्यात लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील डॉ. विजय होळे यांच्या माहितीवरुन आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.लातूर शहरातील चौका-चौकामध्ये बेशिस्त वाहनधारकांमुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाल्याचे चित्र कायम आहे. सिग्नल पडण्यापूर्वीच अनेक वाहनधारक भरधावपणे निघून जातात. परिणामी, अचानकपणे घुसलेल्या बेशिस्त वाहनधारकांमुळे वाहतुकीचा खोळंबा होत आहे. अशा वाहनधारकांवर कारवाईचा बडगा उगारण्याची गरज असून केवळ बेशिस्तपणामुळे अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे समोर आले आहे.

## कसब्यात हिंदू महासंघाचा मनसे उमेदवाराला पाठिंबा

पुणे : राज ठाकरेंविषयी आम्हाला प्रचंड आदर, या निवडणुकीमुळे त्यांना पाठिंबा देण्याची संधी आम्हाला मिळतेय. कथाकथित हिंदुत्ववादी पक्ष हिंदुचे कसं नुकसान करत आहेत त्याबाबत आम्ही १०० पापं असं पुस्तक छापणार आहोत. हिंदुंना गृहित धरू नका आणि हिंदूचे नुकसान करू नका असा संदेश कसब्यातून महाराष्ट्राला जाईल. यावेळी कसब्यात वेगळा निकाल लागेल असे सांगत हिंदू महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे यांनी मनसेचे कसबा पेठेतील उमेदवार गणेश भोकरे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. आनंद दवे यांनी म्हटले की, मंडल आयोग कुणी आणले, मंडल आयोगाचे समर्थन का केले, काश्मीरात हिंदू पंडितांची हत्या झाली तेव्हा तुम्ही सरकारचा पाठिंबा का काढला नाही आमच्याकडे १०० प्रश्न आहेत. आम्ही जाहीर सभेत हे प्रश्न विचारू. गणेश भोकरेसारखा सुशिक्षित तरूण उमेदवार मिळाला असेल तर कसब्याचाही गौरव होईल असे वाटते. आम्ही हिंदू महासंघ म्हणून गणेश भोकरे आणि मनसे यांच्यासोबत कसबा पेठेत नक्कीच मदतीला आहोत असे त्यांनी सांगितले. तसेच निवडणुकीनंतर पक्षाच्या नेत्यांनी काय भूमिका



घेतील हा त्यांचा विषय आहे. आमच्या हातात पुण्यातील ८ मतदारसंघातून चांगले उमेदवार निवडून जाणे. हिंदू म्हणून सांगणारे नव्हे तर ख-या अर्थाने हिंदुत्वाचे रक्षण करणारे उमेदवार निवडून जावेत. हिंदूना घाबरवून ठेवणा-या पक्षांची पुन्हा राज्यात सत्ता येऊ नये अशी हिंदू महासंघाची भूमिका आहे असे हिंदू महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे यांनी म्हटले. दरम्यान, कसब्यात भाजपाने जे उमेदवार दिलेत त्यांच्याबद्दल प्रचंड नाराजी आहे. मला सातत्याने गोरक्षण संघटना, लिंगायत समाज, ब्राह्मण संघटना पाठिंबा देत आहे.

## दिवाळीनिमित्त आमदार धिरज देशमुख यांनी घेतल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी

लातूर / प्रतिनिधी :- लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी लातूर शहर, लातूर ग्रामीणसह जिल्ह्यातील नागरिक, स्नेही, विविध क्षेत्रातील मान्यवर, काँग्रेस व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांची गुरुवारी, दि ३१ ऑक्टोबर रोजी बाभळगाव येथे भेट घेतली. तसेच, सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. सर्वांना दिवाळी आनंद , सुखा - समाधानाची जावो, या शुभेच्छांसह सर्वांनी हरित दिवाळी साजरी करावी, असे आवाहन आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले. शेतकरी, महिला, बेरोजगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि महाराष्ट्राची अस्मिता जपण्यासाठी या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस व महाविकास आघाडीच्या मागे आशीर्वाद उभा कराल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विजय देशमुख , रविंद्र काळे , सुनील पडिले , अनंतराव देशमुख , संतोष देशमुख , उमाकांत खलंग्रे , शेषराव हाके , अनुप शेळके , संजय हरिदास , तुकाराम कोल्हे , सुनिता आरळीकर , बळवंत पाटील , सुरेश चव्हाण , प्रताप पाटील , मोईज शेख , शाम भोसले , प्रमोद जाधव , प्रभाकर केंद्रे , रविंद्र काळे , गोविंद बोराडे , मदन भिसे , मोहन शिरसाठ , जितेंद्र स्वामी , राम स्वामी , सुभाष घोडके , प्रदीप राठोड , कैलास पाटील , राजकुमार पाटील , सचिन दाताळ , विश्वासराव देशमुख , युवराज जाधव , माणिक सोमवंशी , नागनाथ कराड , अशोक राठोड , मनोज



पाटील , श्रीनिवास शेळके , गुरुनाथ गवळी , तुकाराम गोडसे , सुधाकर गवळी उपस्थित होते. तसेच सुरेश लहाने , दिलीप गोटके , रमेश सोनवणे , दिलीप माने , शाम देशमुख , मुंडे , एकनाथ पाटील , बालाजी बिराजदार , प्रेमनाथ आकनगिरे , सचिन सूर्यवंशी , गणेश देशमुख , संभाजी रेड्डी , हरिभाऊ गोडभरले , आशादुल्ला सय्यद , पाशामिया शेख , महेंद्र भादेकर, संजय चव्हाण , प्रवीण सूर्यवंशी , वाल्मिक माडे , राजेसाहेब सवई , रघुनाथ शिंदे , प्रताप पडिले , सतीश पाटील , बाबुराव जाधव , गोपाळ बुरबुरे , विष्णू धायगुडे , अजित काळदाते , विपीन गवरे , शंकर बोळंगे , विलास चामे , बालाजी वाघमारे , विद्याताई पाटील , पूजा इगे , दैवशाला राजमाने , धनंजय वैद्य , नारायण पाटील , प्रमोद कापसे , प्रवीण माने , विश्वनाथ कागले , जयंत कुलकर्णी , प्रकाश सूर्यवंशी , मतीन अली सय्यद , गोविंद पाटील , प्रदीप इगे , ईश्वरप्रसाद चांडक , सुपर्ण जगताप , अरुण वीर , भालचंद्र पाटील , विनोद वीर , मनोज चिखले , गणेश ढगे , व्यंकटराव पाटील , दीपक गवळी , दीपक राठोड , अमोल शिंदे ,महेंद्र मुळे , पप्पू पाटील , प्रवीण कांबळे , बाळासाहेब करमुडे , बालाजी पांढरे , कैलास होळकर , शिरीष यादव , पद्म पाटील, दीपक पठाडे , अमर मोरे , अमोल भिसे , भूषण पनुरे , राज मस्के , समाधान भिसे , परमेश्वर पाटील , अजय राठोड , अनुरथ गव्हाणे , महेश चव्हाण , शंकर देशमुख , शंकर पाटील , बोगदाद सगरे , रवी पाटील , बापू कदम , दिनेश साळुंके , आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## आम्ही करेक्ट कार्यक्रम करणार; सतेज पाटलांचा इशारा

कोल्हापूर : कोल्हापूर उत्तरच्या काँग्रेसच्या आमदार जयश्री जाधव यांनी गुरुवारी (३१ ऑक्टोबर) एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. जयश्री जाधव यांचा प्रवेशाने शिवसेनेचे उमेदवार राजेश क्षीरसागरांचे बळ वाढले आहे, तर काँग्रेसला धक्का असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या राजकीय घडामोडीवर कोल्हापूर काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांनी भाष्य करताना राजेश क्षीरसागर यांना इशारा दिला.

सतेज पाटील यांनी कोल्हापूरमध्ये पत्रकार परिषदेत माध्यमांशी संवाद साधला. सतेज पाटील म्हणाले, जयश्री जाधव यांच्या निर्णयाची खंत वाटते. कारण त्यांचं कुटुंब कोल्हापुरातील एक नामांकित कुटुंब आहे. आणि त्या कुटुंबातील व्यक्तीने असा निर्णय घेणं, हे दुर्दैवी आहे.

सतेज पाटील म्हणाले, पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्यांना निवडून दिले. त्या कार्यकर्त्यांना काय सांगणार? त्यांनी किमान माझ्याशी चर्चा करायला हवी होती. काय झालं माहिती नाही? त्यांच्यावर दबाव आला का? त्या खुलासा करतील त्यावेळी कळेल, असे सांगत सतेज पाटील यांनी जयश्री जाधवांनी खुलासा केला पाहिजे अशी मागणी केली.

सत्ताधाऱ्यांकडून ऐन विधानसभा निवडणुकीत फोडाफोडी सुरू आहे. महाविकास आघाडीचा प्लॅन काय आहे? असा प्रश्न सतेज पाटलांना विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देताना सतेज पाटील म्हणाले, आम्ही फोडण्याची आवश्यकता नाही. त्यांची नाराजी आहे. आम्ही कुणालाही फोडणार नाही. तिथे बसून ते करेक्ट कार्यक्रम करतील, एवढी व्यवस्था मात्र मी करणार आहे असा इशारा सतेज पाटील यांनी दिला.

## ‘ट्रम्पेट’ चिन्हाचे ‘तुतारी’ मराठी भाषांतर रद्द

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने ‘ट्रम्पेट’ चिन्हाचे ‘तुतारी’ हे मराठी भाषांतर रद्द करण्याचा निर्णय घेतला आहेत. तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या चिन्हाचं नाव मात्र तुतारी वाजवणारा माणूस हे कायम ठेवले आहे. लोकसभा निवडणुकीत ट्रम्पेट या चिन्हाचा उल्लेख तुतारी असा करण्यात आल्यामुळे शरद पवार गटाला मोठा फटका बसला असल्याचा दावा केला होता. त्यानंतर आता निवडणूक आयोगाने हा निर्णय दिला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाचा हा निर्णय महत्वाचा आहे. मागील वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली त्यानंतर शरद पवार यांच्या पक्षाला तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह मिळाले. लोकसभा निवडणुकीत राज्यातील अपक्ष उमेदवारांनी ट्रम्पेट हे चिन्ह घेऊन लढले या चिन्हाच मराठीमध्ये भाषांतर तुतारी असे केलं होते. काही लोकसभा मतदारसंघात हजारोंच्या संख्येने या ट्रम्पेट चिन्ह घेऊन उभे असलेल्या उमेदवारांना मिळाली. सातारा लोकसभेत याचा मोठा फटका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला बसला होता. यामुळे शरद पवार यांच्या पक्षाने राज्याच्या निवडणूक अधिका-यांकडे याची तक्रार केली होती. यावरुन राज्याचे निवडणूक अधिकारी एस चोकिंलगम यांनी आता राज्यातील अधिका-यांना नवीन आदेश दिले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE